SAMPLE CONTENT

# मराठी कुमारभारती

# IQB Important Question Bank

नवीन कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित




इयत्ता
## दहावी
(मराठी माध्यम)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४
यांच्याद्वारे नियोजित नवीन अभ्यासक्रमावर आधारित

# मराठी कुमारभारती

# IQB Important Question Bank

इयत्ता दहावी

**ठळक वैशिष्ट्ये:**

- कमीत कमी वेळेत परीक्षेचा अधिकाधिक सराव.
- प्रश्नोत्तरांची गुणनिहाय मांडणी.
- कृतिपत्रिकेच्या प्रारूपानुसार प्रश्नांची रचना.
- भाषाभ्यासातील व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित मुबलक कृती.
- उपयोजित लेखनाच्या उत्तम सरावासाठी कृतींचा समावेश.
- स्वयंमूल्यमापनासाठी कृतिपत्रिका समाविष्ट.

या पुस्तकात समाविष्ट **Q. R. Code** स्मार्टफोनद्वारे स्कॅन करून कृतिपत्रिका प्रारूपाचे विवेचन करणारे, तसेच कवितांचे भावार्थ कथन करणारे व्हिडिओज् पाहता येतील. तसेच नमुना कृतिपत्रिकेच्या खाली दिलेला **Q. R. Code** स्कॅन करून कृतिपत्रिकेची उत्तरसूचीही पाहता येईल.

SAMPLE CONTENT

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 127269

TEID: 12790_JUP

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

दहावीचं वर्ष म्हणजे आपल्या शैक्षणिक जीवनातला महत्त्वाचा टप्पा! या वर्षी आपल्याला शासनाने निर्धारित केलेला ज्ञानरचनावादावर आधारित नवीन अभ्यासक्रम शिकायचा आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्याद्वारे प्रकाशित मूल्यमापन आराखड्याचा सखोल अभ्यास करून **टार्गेट प्रकाशनाचे मराठी कुमारभारती IQB इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

कमीतकमी वेळेत परीक्षेचा अधिकाधिक अभ्यास हा उद्देश ध्यानात ठेवून IQB या पुस्तकाची रचना केली आहे. विद्यार्थ्यांना कृतिपत्रिका प्रारूपाचा अधिकाधिक सराव व्हावा यासाठी संपूर्ण अभ्यासक्रमाची गद्य, पद्य, स्थूलवाचन, भाषाभ्यास व उपयोजित लेखन अशी विभागवार मांडणी केली आहे. प्रत्येक पाठातील निवडक परिच्छेद घेऊन त्यावर गुणांनुसार कृतींचा उत्तरांसहित समावेश केला गेला आहे. पद्य विभागात कवितेच्या अधिक आकलनासाठी प्रत्येकी दोन कृतिसंच देण्यात आले आहेत. 'काव्यपंक्तींचे रसग्रहण' या शीर्षकाखाली प्रत्येक पद्याच्या रसग्रहणावर आधारित कृतींचा समावेश केला गेला आहे. 'स्थूलवाचन' विभागात गुणांनुसार सर्व प्रश्न सोडवून दिले आहेत.

व्याकरण हा भाषेचा पाया समजला जातो, हे लक्षात ठेवून 'भाषाभ्यास' विभागात व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित विविध कृतींचा मुबलक प्रमाणात समावेश केलेला आहे. कृतिपत्रिकेच्या या नवीन प्रारूपामध्ये 'उपयोजित लेखन' हा सर्वाधिक गुणांसाठी विचारला जाणारा विभाग आहे. त्यामुळे, या विभागात विविध लेखनप्रकारांचा आदर्श उत्तरांसहित अंतर्भाव करण्यात आला आहे; जेणेकरून विद्यार्थ्यांची लेखनशैली विकसित होईल. 'कृतिपत्रिकेचे प्रारूप अधिक सुस्पष्ट व्हावे व स्वयंमूल्यमापन करता यावे याकरता नमुना कृतिपत्रिकेचा समावेशही यात करण्यात आला आहे. कृतिपत्रिका प्रारूपाचे स्पष्टीकरण व सर्व कवितांचे विश्लेषण यांचे व्हिडिओज तसेच नमुना कृतिपत्रिकेची उत्तरसूची Q. R. Code मार्फत देण्यात आली आहे.

SAMPLE CONTENT

प्रयत्नांती परमेश्वर! चला ... नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, नवीन अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया, तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबतच आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इमेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

---

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textual contents published by Bureau of Textbook. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents, the Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

---

SAMPLE CONTENT

**कृतिपत्रिका आराखडा (गुणविभागणीसह)**
**मराठी – प्रथम भाषा (कुमारभारती)**
**इयत्ता दहावी**

**एकूण गुण: १००**

## घटकनिहाय गुणविभागणी

| अनु. क्र | विभाग | गुण | विकल्प गुण |
|---|---|---|---|
| १ | गद्य | २४ | – |
| २ | पद्य | २० | – |
| ३ | स्थूलवाचन | ६ | ३ |
| ४ | भाषाभ्यास | २० | – |
| ५ | उपयोजित लेखन | ३० | १३ |
| | एकूण गुण | १०० | ११६ (विकल्पासह) |

## कृतिपत्रिका आराखडा

**विभाग १ : गद्य** **एकूण गुण २४**

**(अ) १ पठित उतारा**
**(आ) १ पठित उतारा**
**(इ) १ अपठित उतारा**

} (शब्दसंख्या १३० ते १५०) **प्रत्येकी ८ गुण**

**८ गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी:**

(१) आकलन कृती – २ गुण

(२) आकलन कृती – २ गुण

(३) व्याकरण कृती – २ गुण

दिलेल्या परिच्छेदात इयत्ता पहिली ते इयत्ता नववीच्या व्याकरण घटकांवर आधारित असणाऱ्या कृती येणे अपेक्षित आहे.

(सर्व घटकांवर आधारित कृती विकल्पाने देणे आवश्यक आहे.)

(४) स्वमत – २ गुण

SAMPLE CONTENT

**विभाग २ : पद्य** **एकूण गुण २०**

**(अ) १ पठित पद्य** } **प्रत्येकी ८ गुण**

**(आ) १ पठित पद्य**

**('अ' व 'आ' या दोन्ही घटकांसाठी पाठ्यपुस्तकातील प्रत्येकी एक कविता कृतिपत्रिकेत दिली जाईल.)**

**८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी:**

(१) आकलन कृती – २ गुण

(२) आकलन कृती – २ गुण

(३) काव्यसौंदर्य कृती – ४ गुण

१. विचारसौंदर्य

२. भावसौंदर्य

३. अर्थसौंदर्य

} **(या ३ घटकांपैकी कोणत्याही दोन घटकांवर २ कृती २/२ गुणांच्या दोन कृतीअपेक्षित.)**

**(इ) काव्यपंक्तींचे रसग्रहण: ४ गुण**

**पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या पद्यांपैकी कोणत्याही एका पद्यातील रसग्रहणास अनुकूल अशा दोन ओळी कृतिपत्रिकेत देणे.**

*** दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करणे.**

**विभाग ३ : स्थूलवाचन** **एकूण गुण ६**

**प्रत्येकी ३/३ गुणांच्या २ कृती**

(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित कृती)

(पाठाचा आशय, शालाबाह्य जीवनाशी सांगड घालणारा आशय, मूल्य, जीवनकौशल्य यांवर आधारित ३ कृती देण्यात येतील, त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित.)

**विभाग ४ : भाषाभ्यास** **एकूण गुण २०**

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती** **एकूण १० गुण**

(१) **समास** – अव्ययीभाव, विभक्ती तत्पुरुष, द्वंद्व, द्विगू – २ गुण

(२) **अलंकार** – रूपक, व्यतिरेक, दृष्टांत, चेतनगुणोक्ती – २ गुण

(३) **वृत्त** – वृत्त ओळखणे / गण पाडणे / लघू गुरू क्रम देणे

भुजंगप्रयात, मालिनी, वसंततिलका – १ गुण

(४) **शब्दसिद्धी** – शब्द – प्रत्ययघटित, उपसर्गघटित, अभ्यस्त – २ गुण

(५) **सामान्यरूप** – १ गुण

SAMPLE CONTENT

(५) **वाक्प्रचार** – २ गुण

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती** **एकूण १० गुण**

(भाषासौंदर्य/ भाषिक समृद्धी)

**(१) शब्दसंपत्ती** – ४ गुण

(१) समानार्थी शब्द

(२) विरुद्धार्थी शब्द

(३) शब्दसमूहांबद्दल एक शब्द

(४) एका शब्दाचे अनेक अर्थ/अर्थछटा

(५) शब्दातील अक्षरांपासून शब्द बनवा.

(प्रत्येकी १/२ गुणांची कृती अपेक्षित) शब्दसंपत्तीच्या घटकांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १/२ गुणांची कृती

**शब्दसंपत्तीशी संबंधित वरील घटकांपेक्षा वेगळी कृती कृतिपत्रिकेत विचारली जाऊ शकते.**

**(२) लेखननियमांनुसार लेखन** – २ गुण

(१) अचूक शब्द ओळखा.

(२) वाक्य लेखननियमांनुसार लिहा.

(प्रत्येक अचूक शब्दाला १/२ गुण, वाक्यातील चुकीच्या शब्दाच्या दुरुस्तीसाठी प्रत्येकी १/२ गुण)

**(३) विरामचिन्हे** – २ गुण

(१) योग्य विरामचिन्हे वापरा.

(२) चुकीची विरामचिन्हे बदला.

**(४) पारिभाषिक शब्द/प्रचलित मराठीतील शब्द** – १ गुण

(गद्य, पद्य या दोन्ही विभागांतील घटकांवर आधारित)

(प्रत्येकी १/२ गुणांसाठी २ कृती)

**(५) अकारविल्हे/ भाषिक खेळ** – १ गुण

(किमान ४ वर्ण अकारविल्हे लावणे)

[**टीप** – विभाग ४ : व्याकरण घटकांतर्गत दिलेल्या कृती या नमुन्यादाखल आहेत. सृजनशील कृतींची नावीन्यपूर्ण रचना करता येणे शक्य आहे.]

**विभाग ५ : उपयोजित लेखन एकूण गुण ३०**

**(अ) विभाग** **विकल्प गुण** **एकूण गुण १०**

(१) पत्रलेखन – ५ गुण (अंतर्गत विकल्प २ पैकी १ पत्र सोडवणे) – **५ गुण**

↓ औपचारिक (मागणी, विनंती) ↓ अनौपचारिक (कौटुंबिक)

SAMPLE CONTENT

(२) सारांशलेखन – ५ गुण (१०० ते १२० शब्दांचा गद्य उतारा)

**(आ) विभाग** **विकल्प नाही.** **एकूण गुण १२**

(१) जाहिरात लेखन (५० ते ६० शब्द) – ६ गुण
(२) बातमी लेखन (५० ते ६० शब्द) – ६ गुण
(३) कथालेखन (८० ते १०० शब्द) – ६ गुण

(३ घटकांपैकी कोणत्याही २ घटकांवर कृती विचारणे. दोन्हीही कृती सोडवणे अपेक्षित आहे.)

**(इ) लेखनकौशल्य** (१०० ते १२० शब्द) **विकल्प गुण** **एकूण गुण ८**
(निबंध लेखन)

(१) प्रसंगलेखन
(२) आत्मकथन
(३) वैचारिक

(३ घटकांपैकी कोणत्याही २ घटकांवर कृती विचारली जाईल. त्यांपैकी कोणतीही एक कृती सोडवणे अपेक्षित आहे.)

[**संदर्भ**: महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे निर्मित मूल्यमापन आराखडा]

[**सूचना:** नवीन अभ्यासक्रमावर आधारित कृतिपत्रिकेच्या प्रारूपाचे सुयोग्य आकलन होण्याकरता शेजारील **Q. R. Code** स्कॅन करून व्हिडिओ पाहा.]

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| | विभाग १ – गदय (एकूण २४ गुण) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| प्र.१. (अ)/(आ) | पठित गदय उतारे (१६ गुण) | १ |
| प्र.१. (इ) | अपठित गदय उतारे (८ गुण) | ५७ |
| **विभाग २ – पदय (एकूण २० गुण)** | | |
| प्र.२. (अ)/(आ) | आकलन व काव्यसौंदर्यावर आधारित कृती (१६ गुण) | ६९ |
| प्र.२. (इ) | काव्यपंक्तींचे रसग्रहण (४ गुण) | ९७ |
| **विभाग ३ – स्थूलवाचन (एकूण ६ गुण)** | | |
| प्र.३. | स्थूलवाचन (६ गुण) | ११३ |
| **विभाग ४ – भाषाभ्यास (एकूण २० गुण)** | | |
| प्र.४. (अ) | व्याकरण घटकांवर आधारित कृती (१० गुण) | १२७ |
| प्र.४. (आ) | भाषिक घटकांवर आधारित कृती (१० गुण) | १६२ |
| **विभाग ५ – उपयोजित लेखन (एकूण ३० गुण)** | | |
| प्र.५. (अ) | पत्रलेखन व सारांशलेखन (१० गुण) | १९५ |
| प्र.५. (आ) | जाहिरातलेखन, बातमीलेखन, कथालेखन (१२ गुण) | २१२ |
| प्र.५. (इ) | लेखनकौशल्य (८ गुण) | २३३ |
| **नमुना कृतिपत्रिका** | | २४९ |


**सूचना:** १. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पाठांचे व पद्यांचे क्रमांक पाठ्यपुस्तकानुसार ठेवण्यात आले आहेत.

२. पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

३. सुलभतेच्या दृष्टीने येथे आकृतिबंधावर आधारित कृतींमध्ये (१/२/३/४) असे अनुक्रमांक देऊन उत्तरे देण्यात आली आहेत. परीक्षेत असे क्रमांक देण्यात येणार नाहीत. परीक्षेत सूचनेनुसार आकृती काढणे अपेक्षित आहे.

SAMPLE CONTENT

विभाग १

# गद्य

## पठित गद्य उतारे - प्रश्न १ (अ)/(आ)

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत गद्य विभागात **प्र.१.(अ) आणि (आ)** मध्ये प्रत्येकी साधारणत: १३० ते १५० शब्दांचे दोन पठित उतारे देण्यात येतील. प्रत्येक उताऱ्यावर ८ गुणांच्या कृती विचारण्यात येतील. यामध्ये विकल्प (Option) देण्यात येणार नाही. या ८ गुणांची कृतीनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे:

१. **आकलन कृती** **२ गुण**

२. **आकलन कृती** **२ गुण**

वरील दोन्ही कृतींमध्ये 'आकृती पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'एका शब्दांत उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा', 'योग्य जोड्या जुळवा', 'कारणे लिहा', 'घटनेचा / कृतीचा परिणाम लिहा', 'एका वाक्यात उत्तर लिहा', '_ असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा', 'तुलना करा', 'फरक लिहा' यांसारख्या वैविध्यपूर्ण कृतीपैकी कोणत्याही कृती विचारल्या जाऊ शकतील.

३. **व्याकरण कृती** **२ गुण**

या कृतीमध्ये दिलेल्या परिच्छेदात आलेल्या इयत्ता पहिली ते नववीच्या व्याकरण घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील.

४. **स्वमत** **२ गुण**

विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारे, अभिव्यक्ती क्षमता व विचारांची मांडणी जोखणारे प्रश्न येथे विचारण्यात येतील.

**लक्षात ठेवा:**

१. दिलेला उतारा दोन वेळा वाचा. २. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.

३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.

४. परीक्षेत आकलन व व्याकरणावर आधारित आकृती पेनने काढणे अपेक्षित आहे.

५. 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा / योग्य पर्याय निवडा' ह्या कृतीच्या उत्तरात विद्यार्थ्यांनी पूर्ण विधान लिहिणे अपेक्षित आहे.

६. 'योग्य जोड्या जुळवा' या कृतीच्या उत्तरात प्रत्यक्ष जोडी लिहिणे अपेक्षित आहे.

SAMPLE CONTENT

# पाठ २: बोलतो मराठी

## उतारा १

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

***i.** [ १ ] — **भाषा वापरताना अर्थाचा अनर्थ टाळण्यासाठी आवश्यक उपाय** — [ २ ]

**ii.** [ १ ] — **प्रत्ययांची जागा अनेकवेळा चुकते अशी ठिकाणे** — [ २ ]

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.२ वरील (ओळ क्र. १३ ते २४) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[शब्दप्रयोगाप्रमाणे वाक्प्रचार... ..................... असे म्हणायला हवे.]**

**२. i. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

*अ. शब्दांचा अर्थ जाणून घेण्याचे साधन [ ]

ब. अकलेचा कांदा म्हणजे [ ]

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

भाषेची खास शैली कोणती असते?

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** **(१)**

एका<u>ऐवजी</u> दुसरे क्रियापद वापरले, <u>तर</u> अर्थाचा अनर्थ होईल.

**ii. खालील शब्दांचे वचन बदला.** **(१)**

अ. बातम्या ब. खांदा

**४. स्वमत** **(२)**

*'तुम्ही <u>शहाणे</u> आहात' या वाक्यातील शहाणे या शब्दाच्या अर्थछटा लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. शब्दकोशाचा वापर करण्याची सवय लावणे
२. क्रियापद वापरताना नामाला योग्य प्रत्यय लावणे

ii. १. सार्वजनिक समारंभ २. वाहिन्या

२. i. अ. शब्दकोश  ब. अतिशहाणा

ii. शब्दप्रयोग व वाक्प्रचार ही भाषेची खास शैली असते.

३. i. ऐवजी – शब्दयोगी अव्यय, तर – उभयान्वयी अव्यय

ii. अ. बातमी  ब. खांदे

४. 'शहाणे' या शब्दातून दोन अर्थछटा निर्माण होतात. त्यातून सुज्ञ, समजूतदार असा एक अर्थ, तर 'अतिशहाणा' हा दुसरा अर्थ प्रतीत होतो. आपल्या बुद्धीचा योग्य वापर करत सारासार विचार करणाऱ्या व्यक्तीकरता 'शहाणे' असा शब्दप्रयोग केला जातो, तर स्वत:ला हुशार समजून बढाई मारणाऱ्या किंवा स्वभावाने आगाऊ असलेल्या व्यक्तीला 'अतिशहाणा' असे म्हटले जाते. म्हणजेच, पहिल्या अर्थछटेत गुण, तर दुसऱ्या अर्थछटेत दुर्गुण अशा अर्थाने हा शब्द वापरला जातो.

उदा. चांगले वागणाऱ्या, चांगले काम करणाऱ्या मुलाबद्दल बोलताना आई 'माझा बाळ शहाणा आहे' असं म्हणते, तर आगाऊपणे वागणाऱ्या मनुष्यास 'शहाणा झालास का रे?' किंवा 'तो जरा अतिशहाणाच आहे' असे म्हटले जाते. अशाप्रकारे, 'शहाणे' या एकाच शब्दातून वेगवेगळ्या अर्थछटा निर्माण होतात.

## उतारा २

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे खालील कृती सोडवा.**

***१. आकृती पूर्ण करा.** (२)

**शब्दांची व्युत्पत्ती शोधण्याचे फायदे लिहा.**

१ | २ | ३ | ४ | उच्चार व संधी समजल्याने शब्द मनात रुजतो

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.३ वरील (ओळ क्र.३० ते ३९) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[भाषेतली गंमत जाणून ............................ अर्थ अवलंबून असतो.**

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** (२)

i. मोरांबा या शब्दाची उत्पत्ती कशी झाली?

ii. दन्तमूलीय म्हणजे काय?

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** (१)

अ. व्युत्पत्ती शोधून आपल्याला <u>खूप</u> नवी माहिती मिळते.

ब. शब्दाचा अर्थ कळल्यावर <u>शब्द</u> मनात पक्का रुजतो.

SAMPLE CONTENT

ii. **खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **(१)**
**(केवलवाक्य/संयुक्तवाक्य/मिश्रवाक्य)**

अ. शब्दांच्या मुळाकडे गेलो, की आपल्या चुकाही होत नाहीत.

ब. उच्चारावरही अर्थ अवलंबून असतो.

४. **स्वमत** **(२)**

'भाषेतली गंमत जाणून घेण्याचा एक मार्ग म्हणजे शब्दांची व्युत्पत्ती शोधणे' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. भाषेची गंमत जाणता येते

२. नवी माहिती मिळते

३. शब्दांची पाळेमुळे किती दूरवर पसरलेली आहेत ते कळते

४. शब्दांच्या मुळांशी गेल्याने शब्दसंदर्भातील संभाव्य चुका टळतात

**२.** i. जुन्या काळी मॉरिशसवरून साखर येत असल्याने तिला मोरस असे म्हटले जाई, त्यामुळे या मोरस शब्दावरून मोरांबा या शब्दाची व्युत्पत्ती झाली.

ii. जे ध्वनी उच्चारताना जिभेच्या टोकाचा वरच्या दातांच्या मुळांना स्पर्श होतो त्या ध्वनींना दंतमूलीय असे म्हणतात.

**३.** i. अ. खूप – संख्याविशेषण ब. शब्द – सामान्यनाम

ii. अ. मिश्रवाक्य ब. केवलवाक्य

**४.** शब्दामागील खरा अर्थ शोधण्याकरता त्याच्या मुळाशी जाणे म्हणजेच त्याच्या व्युत्पत्तीचा शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. एखाद्या शब्दाची निर्मिती कशी झाली, तो इतर एखाद्या भाषेतून स्वीकारण्यात आला आहे का हे सर्व व्युत्पत्ती शोधल्यावर समजते. शब्दांच्या निर्मितीमागची ही सगळी पार्श्वभूमी समजून घेणे रंजक ठरतेच. त्याचबरोबर शब्दांचे मूळ, त्याचा उच्चार, रचना इत्यादी गोष्टी समजल्यामुळे तो शब्द वापरताना चूकही होत नाही. शब्दांविषयीचे असे ज्ञान वाढल्यामुळे आपली भाषा समृद्ध होते, तो शब्द योग्य प्रकारे वापरून त्यातील आनंदही मिळतो, म्हणूनच भाषेचा आनंद खऱ्या अर्थाने लुटायचा असेल, तर शब्दांची व्युत्पत्ती शोधणे महत्त्वाचे ठरते.

SAMPLE CONTENT

## उतारा ३

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे खालील कृती पूर्ण करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

i. [१] — **भाषेवर प्रेम करण्यासाठी करायला हव्या अशा गोष्टी** — [२]

ii. [१] — **मराठी भाषेने आपल्यासाठी केलेल्या गोष्टी** — [२]

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३ वरील (ओळ क्र. ५२ ते ६२) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[आपण आपल्या भाषेवर ........................ विसरून चालणार नाही.]**

**२. i. खालील चौकटी पूर्ण करा.** **(१)**

*१. मराठी भाषेला लेखिकेने दिलेली उपमा [ ]

२. 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी...' या काव्याचे कवी [ ]

**ii. खालील घटनेचे/ कृतीचे परिणाम लिहा.** **(१)**

आपणास भाषेचे अर्थसौंदर्य कळले.

**३. व्याकरण**

**खालील वाक्यांचे सूचनेनुसार काळ बदला.** **(२)**

i. पावसाने स्वत: जातीने हजेरी लावून वनमहोत्सवाला दाद दिली.
(साधा भविष्यकाळ करा.)

ii. सकाळी पाऊस आल्यामुळे माझ्या 'मॉर्निंग वॉक'च्या बेतावर पाणी पडले.
(पूर्ण भूतकाळ करा.)

**४. स्वमत** **(२)**

*लेखिकेने मराठी भाषेचा केलेला सन्मान तुमच्या शब्दांत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. भाषेतील शक्तिस्थळे जाणून घेणे
२. भाषेचा योग्य सन्मान राखणे

ii. १. आपल्या भावजीवनाला आकार दिला
   २. आपल्या भावना व्यक्त करायला आधार दिला

**२.** i. १. आईची   २. कविवर्य सुरेश भट
ii. तर आपण 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी... ' हे कविवर्य सुरेश भटांचे शब्द उच्चारायला खऱ्या अर्थाने पात्र ठरू.

**३.** i. पाऊस स्वत: जातीने हजेरी लावून वनमहोत्सवाला दाद देईल.
ii. सकाळी पाऊस आल्यामुळे माझ्या मॉर्निंग वॉकच्या बेतावर पाणी पडले होते.

**४.** लेखिकेच्या मते मराठी भाषा ही आपल्या मातेसमान आहे. या मातृभाषेने आपले भावजीवन घडवले आहे. आपल्याला आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी आधार दिला आहे. तेव्हा तिची ही थोरवी समजून घेऊन तिला सन्मान देणे हे आपले कर्तव्य आहे. आपण आपल्या या भाषेवर प्रेम केले पाहिजे. आपल्या या भाषेची शक्तिस्थळे समजून भाषेमध्ये पारंगत झाले पाहिजे. जर आपण आपल्या भाषेचा सखोल अभ्यास केला, त्यात प्राविण्य मिळवले, तर परिणामी त्यातले अर्थसौंदर्य आपल्याला उमगेल आणि तेव्हाच आपण 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी...' हे कविवर्य सुरेश भटांचे शब्द उच्चारायला पात्र होऊ, अशा शब्दांत लेखिकेने मराठी भाषेचा सन्मान केला आहे.

# पाठ ३: आजी: कुटुंबाचं आगळ

## उतारा ४

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**आजीने या कामांच्या वाटण्या केलेल्या होत्या**

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.५,६ वरील (ओळ क्र. १८ ते ३२) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[खरं तर आजीनं.................................... पुन्हा डोळं झाकणार.]**

SAMPLE CONTENT

२. **ओघतक्ता पूर्ण करा.** **(२)**

| |
|---|
| **स्वयंपाक झाला की आधी बाळगोपाळांची पंगत बसायची** |
| ↓ |
| १ |
| ↓ |
| **आजी धपाटे घालून खाऊ घालायची** |
| ↓ |
| २ |
| ↓ |
| **शेवटी सगळ्या बायका मिळून जेवत** |

३. **व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखून प्रकार लिहा.** **(१)**

अ. आजीने सगळ्यांना कामाच्या वाटण्या करून दिलेल्या.

ब. काम येत नसेल तिला ती शिकवायची.

**ii. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** **(१)**

सगळ्या बायका मिळून जेवायच्या.

४. **स्वमत** **(२)**

वरील परिच्छेदामधून आजीचे कोणते गुण दिसून येतात ते तुमच्या शब्दांत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. भाकऱ्या करणे  २. धुणं धुणे
३. कालवण करणे  ४. भांडी घासणे

**२.** १. आजी पुढे सरकायची आणि आई किंवा काकी जेवण वाढायची.
२. बाळगोपाळांच्या जेवणानंतर रानातल्या भाकऱ्या बांधल्या जात.

**३.** i. अ. आजी – सामान्यनाम
ब. तिला – तृतीय पुरुषवाचक सर्वनाम

ii. **सगळे पुरुष** मिळून **जेवायचे**.

SAMPLE

४. वरील परिच्छेदावरून आजीच्या अंगी असलेल्या शिस्तबद्धता, उत्तम नियोजन, वेळेचे महत्त्व जाणण्याची वृत्ती आणि प्रत्येक गोष्टीत दक्ष असण्याची सवय या गुणांचा प्रत्यय येतो. लेखकाची आजी संपूर्ण कुटुंबाला शिस्त लावण्याचा सातत्याने प्रयत्न करताना दिसून येते. तिने आपल्या घरातील सर्वांनाच कामे वाटून दिली होती आणि ती कामे त्या-त्या वेळी पूर्ण करण्याबाबत ती काटेकोर होती. त्यातील हयगय तिला पसंत नसे. जेवतानाही ती मुलांना शिस्त लावत असे. मुलांनी व्यवस्थित जेवावं, अन्न टाकू नये, अशा सवयी ती त्यांना लावत असे. सर्वांची जेवणे झाल्यानंतर विश्रांती घ्यायला जाण्यापूर्वीही ती पुढच्या कामांचं नियोजन करत असे. त्यातून तिची नियोजनबद्धता जाणवते. ती सातत्याने दक्ष असल्याने झोपेतही ती सावध असे. कुठेही जराही आवाज झाला तरीही ती जागी होत असे. यावरून ती आपल्या कुटुंबाच्या रक्षणार्थ दक्ष असल्याचे जाणवते.

## उतारा ५

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**आगळीची वैशिष्ट्ये**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.६ वरील (ओळ क्र. ३३ ते ४४) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[झोप होता होता ...................................... संरक्षक कवच होतं.]**

**२. i. योग्य जोड्या जुळवा.** **(१)**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | ढाळज | अ. | वर्तमानपत्राची संपादक |
| ii. | आजी | ब. | गावाचे वर्तमानपत्र |
| | | क. | बातम्या |

**ii. योग्य पर्याय निवडा.** **(१)**

आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं................

अ. नाजुक संरक्षक कवच होतं. ब. भरभक्कम संरक्षक कवच होतं.
क. विचित्र आवरण होतं. ड. जादुई संरक्षक कवच होतं.

३. **व्याकरण**

i. **खालील शब्दांसाठी परिच्छेदात आलेली विशेषणे शोधून लिहा. (१)**

अ. वाघ ब. गणित

ii. **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखून लिहा. (१)**

रात्री आठच्या दरम्यान ढाळजंचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा.

४. **स्वमत (२)**

*'आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं ' या वाक्याचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. सहा फूट लांब आणि पाऊण फूट रुंद
२. सागवानी लाकडापासून बनलेली
३. पितळी वाघाच्या जबड्यात बसलेली कडी असलेले तोंड
४. भिंतीतल्या देवळीत आरपार जाणारी

**२.** i. (i – ब), (ii – अ)
ii. आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं **भरभक्कम संरक्षक कवच होतं.**

**३.** i. अ. पितळी ब. अवघड
ii. रात्री – कालवाचक क्रियाविशेषण अव्यय
की – उभयान्वयी अव्यय

**४.** वर्तमानपत्राच्या माध्यमातून आपल्या आजूबाजूला, जगभरात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे, बदलाचे ज्ञान बातमीरूपाने आपल्यापर्यंत पोहोचवले जाते. लेखकाच्या वाड्याच्या ढाळजेमध्ये दुपारच्या वेळात बायका आपली कामे घेऊन येत. ती पूर्ण करता करता त्यांच्या गप्पा, चर्चा होत असत. त्यातून त्यांचा मनोरंजनाचा हेतू तर साध्य होईच; पण सोबतच आजूबाजूला काय चालले आहे, याबाबत त्यांना माहिती मिळे. वर्तमानपत्रात जशी बातम्यांची चर्चा केला जाते त्याचप्रमाणे ढाळजेतही विविध ठिकाणी घडलेल्या घटनांवर प्रत्यक्ष चर्चा होत असे. जसे वर्तमानपत्रात बातम्या छापण्यापूर्वी त्यांची खात्री करून घेतली जाते त्याचप्रमाणे लेखकाच्या ढाळजेत आलेल्या बातम्या गावभर जाण्यापूर्वी त्यांची शहानिशा होत असे. आजी याची संपादक असे. त्यामुळेच, 'आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं' असे लेखकाने म्हटले आहे.

SAMPLE CONTENT

# पाठ ५: वसंतहृदय चैत्र

## उतारा ६

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. **आकृत्या पूर्ण करा.** (२)

i. वसंताच्या पुष्पमुद्रेचे चिन्ह ल्यालेले महिने: १ | चैत्र | २

ii. चैत्राला दिलेल्या कोणत्याही दोन उपमा: १ | २

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.११ वरील (ओळ क्र. १ ते १६) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[फाल्गुन, चैत्र आणि.............................पानांची सारखी सळसळ.]**

२. i. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

नवपल्लवांनी आणि फुलांनी डवरलेल्या वृक्षलतांव्यतिरिक्त मधुमासाचे वैशिष्ट्य कशात आहे?

ii. **खालील घटनेचे/कृतीचे परिणाम लिहा.** (१)

पिंपळाला नवी पाने आल्यावर उन्हात ती भडक गुलाबी पाने चमकतात.

३. **व्याकरण**

i. **षष्ठी विभक्ती प्रत्यय असलेले कोणतेही दोन शब्द परिच्छेदातून शोधून लिहा.** (१)

ii. **खालील वाक्यांचा काळ ओळखून लिहा.** (१)

अ. जुनी पाने गळता गळता नवी येत होती.

ब. फुलांतून, फळांतून मधुरस वाहत असतो.

४. **स्वमत** (२)

'चैत्र हा खरा वसंतात्मा, मधुमास आहे' या संकल्पनेचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. फाल्गुन २. वैशाख

ii. १. वसंतात्मा २. मधुमास

**२.** i. नवपल्लवांनी आणि फुलांनी डवरलेल्या वृक्षलतांबरोबरच फुलांतून, फळांतून वाहणारा मधुरस हे मधुमासाचे वैशिष्ट्य आहे.

ii. परिणामी त्या झाडावर सुंदर पुष्पांचे गेंद फुलल्याचा भास होतो.

**३.** i. १. पुष्पमुद्रेचे २. पानांच्या

ii. अ. अपूर्ण भूतकाळ ब. रीती वर्तमानकाळ

**४.** फाल्गुन, चैत्र आणि वैशाख या तीन महिन्यांमध्ये वसंतऋतू निसर्गावर राज्य करत असतो. हा ऋतू निसर्गामध्ये सौंदर्याची लाट घेऊन येतो. त्यात अनेक बदल घडवून आणतो; मात्र चैत्र महिन्यात वसंताचे सौंदर्य परिसीमा गाठते. हिरवी पालवी, रंगीबेरंगी फुले यांचबरोबर फळांचे सौंदर्यही विलक्षण असते. याच काळात फळे, फुले मधुरसाने ओसंडून वाहत असतात. एकेक काडी जोडत पक्षी आपापली घरटी विणत, त्यात स्वप्न सजवत असतात. निसर्गाच्या मनमोहक रूपाचे दर्शन या चैत्रातच होत असते आणि ते दृष्ट लागावी इतके रम्य असते. असा हा सृष्टीला नवचैतन्याने भरणारा, वसंतऋतूत प्राण फुंकणारा हा महिना जणू त्या ऋतूचा आत्माच असतो. त्यामुळे, या चैत्राला वसंतात्मा व मधुमास म्हटले आहे.

## उतारा ७

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. ***i. उताऱ्याच्या आधारे दिलेल्या वैशिष्ट्यावरून झाडाचे नाव लिहा.** **(१)**

| | वैशिष्ट्ये | झाडाचे /वेलीचे नाव |
|---|---|---|
| अ. | निळसर फुलांचे तुरे | ________ |
| ब. | कडवट उग्र वास | ________ |

**ii. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

चैत्रातील पर्णशोभेचे आणि फळशोभेचे वर्णन या झाडांशिवाय अपुरे आहे.

| १ | २ |
|---|---|

SAMPLE CONTENT

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.१२ वरील (ओळ क्र. ४८ ते ६०) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[शेजारचे कडुनिंबाचे ................................ तेही झोके घेतात.]**

२. i. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)
लेखिकेने करंजाच्या फुलाला कशाची उपमा दिली आहे?

ii. **कारण शोधा व लिहा.** (१)
पोपट किंवा कावळे कैऱ्यांवर चोचींनी प्रहार करतात कारण......

३. **व्याकरण**
**खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय ओळखून विभक्ती लिहा.** (२)

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| i. | तुऱ्यांनी | | |
| ii. | रूपात | | |

४. **स्वमत** (२)
*वसंतऋतूशी निगडित तुमची एखादी आठवण समर्पक शब्दांत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. अ. कडुनिंब ब. करंज
ii. १. आंबा २. फणस

२. i. लेखिकेने करंजाच्या फुलाला टोपडे घातलेल्या बाल घनश्यामाची उपमा दिली आहे.
ii. त्यांना त्या कैऱ्या पाडाला लागल्या आहेत की नाहीत ते पाहायचे असते.

३.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| i. | तुऱ्यांनी | **नी** | **तृतीया** |
| ii. | रूपात | **त** | **सप्तमी** |

४. दोन वर्षांपूर्वी वसंतऋतूच्या आगमनाच्या काळात मी आई-बाबांसोबत आजोळी गेलो होतो. अंगणात जाताच नेहमी आकर्षून घेणारे सोनचाफ्याचे झाड पूर्णपणे छाटलेले दिसले. माझ्या आवडीचे असलेले मात्र आता एकही पान नसलेले ते झाड पाहून माझ्या डोळ्यांत पाणी दाटले. आजोबांनी मला जवळ घेत ते झाड

SAMPLE CONTENT

छाटणे त्याच्या वाढीकरता आवश्यक असल्याचे समजावले आणि लवकरच वसंत आपला महिमा दाखवेल असेही सांगितले. दोन-तीन दिवसांतच त्या झाडामधून हिरवे धुमारे डोकावू लागले आणि माझी उत्सुकता ताणली. या मोजक्याच धुमाऱ्यांनी पुढच्या दोन दिवसांत संपूर्ण झाड व्यापून टाकले. ती कोवळी – लुसलुशीत पोपटी रंगाची पाने आता वेगाने वाढू लागली. बघता बघता आठवडाभरातच त्या सोनचाफ्याचे हे हिरवाईने नटलेले रूप पुन्हा एकदा मन आकर्षून घेऊ लागले. वसंताचा हा महिमा प्रत्यक्ष पाहताना एक वेगळेच समाधान लाभले.

## उतारा ८

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**लेखिकेला दिसणाऱ्या पक्ष्यांच्या घरट्यांचे विशेष**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.१३ वरील (ओळ क्र. ६३ ते ७७) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[आणि फणस? त्याला..........................पाहायला जास्त आवडते.]**

**२. ओघतक्ता पूर्ण करा.** **(२)**

**पौष – माघात फणसाला फुगीर मिरचीसारखे हिरवे कोके येतात**
↓
१
↓
२
↓
**खसखशीसारखे बारके दाणे दिसू लागतात**
↓
३
↓
४
↓
**ते तंतू गळले, की संपूर्ण अवयवांनी युक्त पण आकाराने मुसुंब्याएवढा फणस तयार होतो**

SAMPLE CONTENT

३. **व्याकरण**

**अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा व त्यांचे प्रकार लिहा.** (२)

i. फणसाला फुले धरत नाहीत तर पौष – माघात त्याला हिरवे कोके येतात.

ii. फणस अगदी बुंध्यापासून धरतात.

४. **स्वमत** (२)

*'चैत्र महिन्यातील पक्ष्यांच्या घरट्यांना लेखिका वसंताच्या चित्रलिपीतली विरामचिन्हे म्हणतात', या विधानाची सत्यता पटवून द्या.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. लोंबत्या आकाराची २. वाटोळी चेंडूसारखी
३. पसरट गोल ४. काळी कबरी

**२.** १ एकेक कोका दुभंगतो २. वरचे टरफल तपकिरी होऊन गळते
३. ते दाणे वाढून पांढऱ्या किडीसारखे तंतू बनतात
४. त्यांच्या खालून काटे वाढतात

**३.** i. फुले – सामान्यनाम
पौष – विशेषनाम
ii. अगदी – परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय
पासून – शब्दयोगी अव्यय

**४.** चैत्र महिन्यात वसंताच्या आगमनामुळे निसर्गात सुंदर बदल होऊ लागतात. जणू निसर्गाचे हे नवेपण तो चित्ररूपानेच आपल्यासमोर मांडत असतो. त्याची ही लिपी जितकी समजून घेता येते, जितकी अधिक वाचता येते, तितका आनंद त्यातून गवसत जातो. या चित्रलिपीत पक्षी आणि त्यांची घरटी यांना विशेष स्थान आहे. चैत्रात पक्ष्यांना नवानिर्मितीचे वेध लागतात. त्याची पूर्वतयारी म्हणून घरटी बांधणे, ती सजवणे अशी कामे सुरू असतात. विविध आकारांची, विविध प्रकारची घरटी पाहताना आपली नजर त्यातील सौंदर्यावर खिळली जाते. त्यांचे सौंदर्य पाहताना मन तेथे क्षणभर घुटमळते, स्थिरावते आणि त्या सुखद, मनोरम दृश्याचा काही काळ थांबून आस्वाद घेते. त्यातून मनाला विश्राम मिळतो. त्यामुळे, अखंड चालणाऱ्या या चित्रलिपीतील हा विराम भाषेतील विरामचिन्हांप्रमाणे भासतो, जो निसर्गाचे अप्रतिम सौंदर्य थबकून पाहायला भाग पाडतो.

SAMPLE CONTENT

# पाठ ७ : गवताचे पाते

## उतारा ९

**प्र.१.(अ)/(आ).उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** (२)

गवताच्या पात्याची स्वभाववैशिष्ट्ये

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.२४ वरील (ओळ क्र. १ ते १८) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[हिवाळा नुकताच सुरू................................पृथ्वीवर पडत होती!]**

२. i. **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** (१)

वसंताच्या संजीवक स्पर्शाच्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर ________

अ. फुलांत झाले होते. ब. गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते.

क. सुंदर छतात झाले होते. ड. पाचोळ्यात झाले होते.

*ii. **कारण शोधा व लिहा.** (१)

झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्यानं गळून पडणाऱ्या पानाकडे तक्रार केली, कारण .........

३. **व्याकरण**

i. **खालील वाक्यांतील अव्यये ओळखून त्यांचा प्रकार लिहा.** (१)

अ. अरे जा! चिडखोर बिब्बा कुठला!

ब. पुन्हा हिवाळा आला.

ii. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.** (१)

हे <u>गाणं</u> चाललंय.

४. **स्वमत** (२)

*गवताच्या पात्याच्या ठिकाणी तुम्ही असता, तर तुम्ही पानाला काय उत्तर दिले असते?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. चिडखोर  २. अरसिक  ३. तक्रारखोर  ४. स्वप्नाळू

**२.** i. वसंताच्या संजीवक स्पर्शाच्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर **गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते.**

ii. गवताचे चिमणे पाते धरणीमातेच्या कुशीत झोपत सुंदर स्वप्न पाहत असताना, झाडावरून गळून पडणाऱ्या पानाच्या आवाजाने त्याची झोपमोड होऊन त्याचे स्वप्न भंग पावले.

**३.** i. अ. अरे जा! – केवलप्रयोगी अव्यय

ब. पुन्हा – कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

ii. **ही गाणी चाललीत.**

**४.** गवताच्या पात्याच्या जागी मी असते, तर मी पानाला समजावले असते, की तू तुझ्या या अस्तित्वाचा उगीचच अहंकार बाळगू नकोस. आज उच्च स्थानी असणारा कधीच जमिनीवर येणार नाही असे होत नाही. आज ना उद्या तुलाही जमिनीतच मिसळावे लागेल. ज्या मातीमध्ये तू विलीन होणार आहेस त्याच मातीतून माझा जन्म पुन्हा एकदा होणार आहे. तीच माती माझ्या जन्माचे कारण बनणार आहे. त्यामुळे, आपले दोघांचेही जीवन या मातीशी संबंधित आहे. आपण परस्परांशी वाद घालण्यात काहीच अर्थ नाही. यातून काहीही निष्पन्न होणार नाही. त्यामुळे, आपण न भांडता, सामंजस्याने वागून आपापली भूमिका बजावली पाहिजे.

## उतारा १०

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

***i.** [१] — **पानाची स्वभाववैशिष्ट्ये** — [२]

**ii.** [१] — **गवताच्या पात्याकरता परिच्छेदात आलेले कोणतेही दोन शब्द व शब्दसमूह** — [२]

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.२४ वरील (ओळ क्र. ९ ते २१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[पानाला राग आला..................................चेंदामेंदा केला यांनी !]**

SAMPLE CONTENT

*२. **कारणे लिहा.** (२)

i. 'अरसिक गवताच्या पात्याला गाणं समजणार नाही' असे गळून पडणारे पान म्हणाले कारण ....

ii. वसंताच्या संजीवक स्पर्शाने पानाचे रूपांतर चिमुकल्या पात्यात झाले, कारण ...

३. **व्याकरण**

**i. खालील वाक्यांचे काळ ओळखा.** (१)

अ. हे गाण चाललंय !

ब. बोलता बोलताच ते पान पृथ्वीवर पडले आणि धरणीमातेच्या कुशीत झोपी गेले.

**ii. खालील नामांसाठी पाठात आलेली विशेषणे शोधा व लिहा.** (१)

अ. ☐ बिब्बा    ब. ☐ वातावरण

४. **स्वमत** (२)

'माणसातील ठरावीक मनोवृत्तीची पुनरावृत्ती वारंवार होत असते' हे परिच्छेदाच्या आधारे स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. स्वत:च्या उच्च पदाचा खोटा अभिमान

२. दुसऱ्याला क्षुद्र लेखण्याची वृत्ती

ii. १. चिडखोर बिब्बा    २. क्षुद्र

**२.** i. गवताचे पाते जमिनीवरील मातीत असल्याने त्याला पानाप्रमाणे उच्च वातावरणाची कल्पना नाही, त्याने कधीही जीवनगाणे गायलेले नाही, असे पानाचे मत आहे.

ii. वसंताच्या संजीवक स्पर्शात विलक्षण जादू होती.

**३.** i. अ. अपूर्ण वर्तमानकाळ    ब. साधा भूतकाळ

ii. अ. चिडखोर    ब. उच्च

**४.** 'गवताचे पाते' या रूपक कथेतील प्रस्तुत परिच्छेदाच्या आधारे लेखकाने गवताचे पाते व पिकलेले पान यांच्या संवादातून पिढ्या-पिढ्यांमधील असलेल्या विचारांतील तफावतीवर, मानवी जीवनातील विसंवादांवर प्रकाश टाकला आहे. मानवाच्या जन्मापासून त्याच्या वाढीबरोबर त्याच्या विचारांचीही जडणघडण होत असते.

SAMPLE

बदलत्या भूमिकेनुसार त्याच्या विचारांमध्ये बदल होत जातात. त्यामुळे, दोन पिढ्यांमधील विचारांची दरी वाढून त्यांच्यात कलह सुरू होतात. तरुण पिढीला आपल्या वडील पिढीचा उपदेश आवडत नसतो; परंतु आजची तरुण पिढी जेव्हा प्रौढ बनते तेव्हा तीही जुनाच कित्ता गिरवते आणि पुढच्या तरुण पिढीला उपदेशही करते. अशाप्रकारे, मानवी मनोवृत्तींची पुनरावृत्ती होत राहते. दुसऱ्याची स्थिती लक्षात न घेता माणूस नेहमी स्वत:च्याच भूमिकेतून विचार करत राहतो.

# पाठ ८ : वाट पाहताना

## उतारा ११

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**लेखिकेने बालपणी उन्हाळ्याच्या सुट्टीत अनुभवलेल्या कोणत्याही चार गोष्टी**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.२७ वरील (ओळ क्र. १ ते १३) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[होळीनंतर थंडी झपाट्यानं ............................ पाहत असू आम्ही!]**

**२. i. खालील घटनेचे / कृतीचे परिणाम लिहा.** **(१)**

रात्रीचे मऊगार हात अंगावर फिरायला लागले.

**ii. कारण शोधा.** **(१)**

आवाजाची वाट पाहण्याचं सार्थक व्हायचं, कारण .......

**३. व्याकरण**

**खालील नामांचे सामान्यनाम, विशेषनाम व भाववाचकनाम असे वर्गीकरण करा.** **(२)**

मार्च, आळस, पुस्तक, मोगरा

**४. स्वमत** **(२)**

तुम्ही तुमची सुट्टी कशी घालवता? तुमच्या शब्दांत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. अंगणातील हजारी मोगऱ्याचे झाड
२. शनिवारवाड्यातून वेचून आणलेली बकुळीची फुले
३. माठातलं वाळा घातलेले पाणी
४. अंगणभर पडणारी वाळवणं

**२.** i. परिणामी झोपेची गडद चाहूल येत असे.
ii. 'पहाटे कोकिळेचे कुंजन आपल्या कानी पडेल का? असा विचार मनात घेऊन गाढ झोपलेल्या लेखिकेला पहाटे कोकिळेची कुहूऽकुहूऽ ऐकू यायची व तिच्या वाट पाहण्याचं सार्थक व्हायचं.

**३.**

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|
| पुस्तक | मार्च | आळस |
| | मोगरा | |

**४.** मी सुट्टी सुरू होण्यापूर्वीच सुट्टीत काय-काय करायचे याचे नियोजन करतो. त्यामुळे, मला ठरवलेल्या वेळात माझ्या आवडीच्या सर्व गोष्टी पूर्ण करता येतात. मनमुराद खेळण्यासोबतच मी घरच्यांशी भरपूर गप्पा मारतो. माझ्या सुट्टीतील सर्वांत सुंदर भाग म्हणजे मी काही दिवस गावी जाऊन आजी, आजोबांसोबत वेळ घालवतो. आजोबांसोबत जाऊन शेतीची कामे जाणून घेतो. त्यांचा वर्षानुवर्षं जमा केलेला पुस्तकांचा खजिना मला उपलब्ध होतो. त्याचा मनसोक्त आस्वाद घेतो. आजीकडून खूप लाड करून घेतो. घरी परतल्यानंतर मी आणि माझे मित्र मिळून हस्तकलेच्या क्लासमध्ये दरवर्षी प्रवेश घेतो. दरवर्षी नवनव्या वस्तू बनवायला शिकतो. या सगळ्या गोष्टींमध्ये वेळ कसा जातो तेच कळत नाही. अशा रीतीने संपूर्ण सुट्टीत मी नेहमी न करू शकणाऱ्या सर्व गोष्टी करण्याचा प्रयत्न करतो.

## उतारा १२

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.** [१] — **लेखिकेच्या घरामागील उंबराच्या झाडाचे कोणतेही दोन विशेष** — [२]

SAMPLE CONTENT

ii. १ – **लेखिका वाट पाहत असलेल्या कोणत्याही दोन गोष्टी** – २

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.२७-२८ वरील (ओळ क्र. २२ ते ३१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[आणखी एक वाट पाहणं............................उगाच वाटत राहतं!]**

***२. तुलना करा.** **(२)**

| व्यक्तीशी मैत्री | कवितेशी मैत्री |
|---|---|
| | |

**३. व्याकरण**

**गटात न बसणारा शब्द ओळखून तो वेगळा का आहे ते लिहा.** **(२)**

i. कधीकधी, पण, पुन्हा, उगाच

ii. ठेवलं, बोलतो, पाने, धावतो

**४. स्वमत** **(२)**

'वाट पाहणे' या संदर्भातील तुमचा अनुभव लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. कशीतरी पाने  २. गाठीगाठी असणारे

ii. १. उंबरावर उतरणाऱ्या पोपटांच्या थव्यांची

२. लालसर गोड उंबरांची

**२. तुलना करा.**

| व्यक्तीशी मैत्री | कवितेशी मैत्री |
|---|---|
| व्यक्तीशी मैत्री केल्यास आपल्या मनात येईल तेव्हा आपण त्यांना बोलावतो, त्यांना भेटून त्यांच्याशी बोलतो. | कवितेशी मैत्री केल्यास ती आपण बोलावल्यावर हमखास येतेच असे नाही, तर तिला हवे तेव्हाच, रात्री-अपरात्री कधीही येते. |

SAMPLE CONTENT

३. i. पण - कारण 'पण' हे उभयान्वयी अव्यय असून इतर सर्व क्रियाविशेषण अव्यये आहेत.

ii. पाने - कारण 'पाने' हे सामान्यनाम असून इतर सर्व क्रियापदे आहेत.

४. तीन वर्षांपूर्वी मूल्यशिक्षणाचा उपक्रम म्हणून मी सोनचाफ्याचे कलमी रोप लावले. दोनच दिवसांत ते रोप टवटवीत दिसू लागले. त्या दिवसापासून झाडाला फूल कधी लागेल याची वाट पाहणं सुरू झालं. रोज सकाळी उठून त्या फूटभर उंचीच्या झाडाभोवती फिरून कुठे कळी दिसते का? ते पाहू लागलो. न चुकता पाणी घालणे, वेळोवेळी शेणखत आणि कीटकनाशके फवारणे असा कार्यक्रम सुरूच होता. झाडाने चांगलाच जोम धरला होता. जसजशी झपाट्याने त्याची वाढ होती तसतशी माझी उत्कंठा वाढून फुलांची वाट पाहण्याची भावना अधिक तीव्र होऊ लागली. जाता-येता ते झाड मी न्याहाळू लागलो. हळूहळू झाड चांगले पाच फुटांपर्यंत वाढले; पण माझी मात्र निराशाच होत होती. मी अगदी अधीर झालो होतो. अखेरीस एक दिवस सकाळी जाग येताच माझ्या नाकाला सोनचाफ्याच्या सुगंधाची चाहूल लागली. क्षणात झोप उडून मी बागेत पोहोचलो. हिरव्यागार पानांतून डोकावणारी दोन पिवळीजर्द फुले जेव्हा मी डोकावताना पाहिली तेव्हा झालेला आनंद अवर्णनीय होता. या 'वाट पाहण्यानंतरचा' हा आनंद अतुलनीयच होता.

## उतारा १३

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**वाट पाहण्यामुळे वाढीस लागणाऱ्या गोष्टी**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २८ वरील (ओळ क्र. ५८ ते ६६) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**['वाट पाहणं' ही गोष्ट ................................. ओढही वाढेल!]**

**२. i. योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** **(१)**

एखाद्या गोष्टीची वाट पाहायला लागते तेव्हाच ________

अ. आयुष्य कंटाळवाणे होते. ब. तिची किंमत कळत जाते.

क. यातना होते. ड. ती गोष्ट आपणास प्राप्त होते.

SAMPLE CONTENT

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

'वाट पाहणं' यात कोणत्या गोष्टी भरलेल्या असतात.?

**३. व्याकरण**

**i. वरील परिच्छेदातील भाववाचक नामाची कोणतीही दोन उदाहरणे लिहा.** **(१)**

**ii. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. शेतकरी ब. संत

**४. स्वमत** **(२)**

*'वाट पाहणे एरवी सुखाची गोष्ट नसली तरी अनेक गोष्टींचे मोल जाणवून देणारी आहे.' या विधानाची सत्यता पटवून द्या.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. सुखाची चव २. यशाची गोडी
३. प्रेमातील, मायेतील तृप्ती ४. आयुष्याबद्दलची ओढ

**२.** i. एखाद्या गोष्टीची वाट पाहायला लागते तेव्हाच **तिची किंमत कळत जाते.**

ii. 'वाट पाहणं' यात दु:ख, काळजी, भीती, अस्वस्थता, तडफड अशा अनेक गोष्टी भरलेल्या असतात.

**३.** i. अस्वस्थता, गोडी

ii. अ. शेतकरीण ब. संत

**४.** वाट पाहण्यामध्ये दु:ख, आतुरता, कळकळ, अपेक्षा, तळमळ अशा अनेक भावनांची सरमिसळ असते. या सर्व भावना निश्चितपणे सुखदायी नसतात; पण तरीही हे वाट पाहणं जीवनात अनेक गोष्टी शिकवून जातं. ज्या गोष्टीची, व्यक्तीची आपण वाट पाहत आहोत त्या गोष्टीचे, त्या व्यक्तीचे मोल आपल्या लक्षात येते. अनेकवेळा सहजपणे मिळालेल्या गोष्टींची, सुखाची खरी किंमत आपल्याला जाणवत नाही; पण जेव्हा तीच गोष्ट किंवा तेच सुख वाट पाहिल्यानंतर मिळते, तेव्हा त्याची खरी किंमत, खरे मूल्य आपल्याला जाणवते. त्या गोष्टीसाठी तडफड सहन केल्यानेच तिचे मोल समजते. त्यामुळे, वाट पाहणे एरवी सुखाची गोष्ट नसली तरी अनेक गोष्टींचे मोल किती आहे याची जाणीव करून देते.



SAMPLE CONTENT

# पाठ १०: आप्पांचे पत्र

## उतारा १४

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**परिच्छेदाच्या आधारे खालील व्यक्तींचे महत्त्व स्पष्ट करा.**

| खेळपट्टीची काळजी घेणारा | नर्स |
|---|---|
| १ | २ |

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.३३ वरील (ओळ क्र. १७ ते २५) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[पत्र लिहिण्याचं कारण............................खूप मोठा वाटा असतो.]**

**२. i. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ. या पदावरूनही चांगले काम करता येते

ब. दरवर्षी शाळेत साजरा होणारा दिन

***ii. योग्य पर्याय निवडा.** **(१)**

शिपाईसुद्धा कौतुकास पात्र ठरतो जेव्हा ________

अ. तो रोज उपस्थित असतो. ब. तो सर्वांची काळजी घेतो.

क. तो चांगलं काम करतो. ड. तो सर्वांशी चांगले बोलतो.

**३. व्याकरण**

**i. रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय लिहा.** **(१)**

अ. पत्र लिहिण्याचं कारण एवढंच आहे, ________ पुढच्या वर्षी तुम्ही शाळा संपवून कॉलेजमध्ये जाणार. (आणि, व, की, म्हणून )

ब. आयुष्यात काय व्हायचं याचा निर्णय घ्यायची वेळ तुमच्यावर येणार, ________ एक आठवण करून देतो. (आणि, व, किंवा, म्हणून)

**ii. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. मुख्याध्यापक ब. शिक्षक

**४. स्वमत** **(२)**

'कोणतेही काम हे कमी दर्जाचे नसते' हे विधान तुम्हांला पटते का?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. क्रिकेटच्या सामन्याचा निर्णय ठरवण्यात खेळपट्टीचा मोठा वाटा असल्याने खेळपट्टीची काळजी घेणारा महत्त्वाचा ठरतो.

२. वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर आणि नर्स यांचे रुग्णसेवेचे कार्य परस्परावलंबी असल्याने नर्सलाही डॉक्टरांएवढे महत्त्व असते.

**२.** i. अ. शिपाई ब. शिक्षक दिन

ii. शिपाईसुद्धा कौतुकास पात्र ठरतो जेव्हा, **तो चांगलं काम करतो.**

**३.** i. अ. की ब. म्हणून

ii. अ. मुख्याध्यापिका ब. शिक्षिका

**४.** प्रत्येक काम हे त्याच्या स्थानी महत्त्वाचे असते. त्यामुळे, कोणते काम छोटे अथवा मोठे असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. बँकेमध्ये काम करणाऱ्या मोठ्या अधिकाऱ्याबरोबरच तेथील ऐवजाचे रक्षण करणारा वॉचमनही तेवढाच महत्त्वाचा ठरतो. त्याच्यामुळेच बँकेचे चोरांपासून रक्षण होते. सफाई कामगारांनी स्वत:ची पर्वा करत शहराचा कचरा साफ केला नाही तर शहरात घाणीचे, पर्यायाने अनारोग्याचे वातावरण पसरून प्रत्येक व्यक्ती त्याला बळी पडेल. यावरून त्यांचे कार्य किती मोठे आहे याची कल्पना आपण करू शकतो, म्हणूनच कोणतेही काम कमी दर्जाचे नसते हे पटते. यासाठीच प्रत्येकाने आपले काम चोखपणे व व्यवस्थित करणे महत्त्वाचे असते.

SAMPLE CONTENT

## उतारा १५

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** (२)

वृक्षसंवर्धनाचे फायदे

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.३४ वरील (ओळ क्र. ४४ ते ५४) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[एका माणसाने दहा झाडं जरी.........................मुलं गरजेची आहेत.]**

२. **i. एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

माणसांची सावली व झाडांची सावली यांत कोणता फरक आहे?

*ii. **कारण शोधा व लिहा.** (१)

पुस्तकाची पाने व झाडाची पाने दोन्ही महत्त्वाची असतात कारण .....

३. **व्याकरण**

i. **गटात न बसणारा शब्द शोधून तो वेगळा का आहे ते लिहा.** (१)

लाखो, दोन्ही, निसर्गसंपन्न, दहा

ii. **खालील शब्दांची विभक्ती ओळखून लिहा.** (१)

अ. माणसाने    ब. पानांत

४. **स्वमत** (२)

'देश किती श्रीमंत आहे हे दाखवायचं असेल, तर झाडी खूप आवश्यक आहे' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ सांगा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. १. देशाचे चित्र बदलून जाते

२. निसर्गसंपन्नता येते

३. झाडांची सावली अनेक पिढ्यांच्या कामी येते

४. देश श्रीमंत होतो

२. i. माणसं कितीही मोठी झाली तरीही त्यांची सावली कोणाला उपयुक्त ठरत नाही मात्र झाडं मोठी झाली, की त्यांची सावली कित्येक पिढ्यांकरता उपयोगी ठरते.

ii. पुस्तकातील पानांत डोक्याचे खाद्य तर झाडाच्या पानांत झाड जगवण्याचे बळ असल्याने ही दोन्ही प्रकारची पानं महत्त्वाची असतात.

३. i. निसर्गसंपन्न - कारण 'निसर्गसंपन्न' हे गुणविशेषण असून इतर सर्व संख्याविशेषण आहेत.

ii. अ. तृतीया    ब. सप्तमी

४. सध्याच्या काळात संपूर्ण जग हे प्रदूषणाच्या विळख्यात अडकले आहे. यातून जगाला सुखरूपपणे बाहेर काढण्याचे कार्य केवळ झाडेच करू शकतात. त्यामुळे, जेथे अधिक झाडे तेथे अधिक शुद्ध, स्वच्छ, आरोग्यदायी वातावरण असणे साहजिकच आहे. या वातावरणातच मानव प्रगती करू शकतो. परिणामी, ज्या देशात झाडे जास्त तेथे समृद्धी

SAMPLE CONTENT

व पर्यायाने श्रीमंती अधिक हे आजच्या घडीचे मुख्य सूत्र बनले आहे. एका पिढीने जपलेली झाडांच्या रूपातील संपत्ती पुढील कित्येक पिढ्यांकरता फायदेशीर ठरते. ही शाश्वत स्वरूपाची संपत्ती देशाच्या विकासाकरता उपयुक्त ठरते, म्हणूनच देश किती श्रीमंत आहे हे दाखवायचं असेल तर झाडी खूप आवश्यक आहे.

# पाठ ११ : गोष्ट अरुणिमाची

## उतारा १६

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(१)**

**i.** [१] — **अरुणिमाची गुगलवरील ओळख** — [२]

***ii. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ. अरुणिमाच्या कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय घेणारे [ ]

ब. फुटबॉल आणि व्हॉलीबॉलची नॅशनल चॅम्पियन [ ]

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.३९ वरील (ओळ क्र. १ ते १३) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[दोस्तांनो, मी...अरुणिमा......................दिल्लीला जाणे भाग होते.]**

**२. कारणे शोधा व लिहा.** **(२)**

i. भाईसाबनी अरुणिमाला सीआयएसएफमध्ये नोकरी मिळते का ते बघण्याचा सल्ला दिला कारण ......

ii. अरुणिमाला दिल्लीला जाणं भाग होतं कारण......

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांचा काळ ओळखा.** **(१)**

अ. माझे वडील मी लहान असतानाच देवाघरी गेले.

ब. फॉर्ममध्ये नेमकी माझी जन्मतारीख चुकवलेली होती.

**ii. अधोरेखित शब्दाची जात ओळखून तिचा प्रकार लिहा.** **(१)**

लखनऊ<u>पासून</u> २०० कि.मी अंतरावर असणारे <u>आंबेडकरनगर</u> हे माझं गाव.

**४. स्वमत** **(२)**

'गिर्यारोहण' या छंदाबाबत तुमचे मत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली अपंग महिला

२. माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली अपंग भारतीय

ii. अ. भाईसाब (मोठ्या बहिणीचे पती)

ब. अरुणिमा सिन्हा

**२.** i. त्यामुळे अरुणिमा खेळाशी जोडलेली राहणार होती.

ii. सीआयएसएफच्या नोकरीसंदर्भातील फॉर्ममध्ये अरुणिमाची जन्मतारीख चुकवलेली असल्याने तो घोळ तिला निस्तरायचा होता.

**३.** i. अ. साधा भूतकाळ ब. पूर्ण भूतकाळ

ii. पासून - शब्दयोगी अव्यय, आंबेडकरनगर – विशेषनाम

**४.** गिर्यारोहण म्हणजे थरार, रोमांच, आनंद यांचा एकत्रित अनुभव. विशिष्ट टप्प्यापर्यंत पोहोचण्याचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून तेथपर्यंत पोहोचण्याकरता केलेला रोमांचकारी प्रवास हे गिर्यारोहणाचा छंद जडण्यामागचे महत्त्वाचे कारण ठरते. गिर्यारोहण करताना मिळालेला निसर्गाचा सहवास, चढाई करताना अनुभवलेला थरार आणि किंचितशी भीती, चढाई पूर्ण झाल्यानंतर विलक्षण समाधान मिळवून देते. मनाला ताजेतवाने करते. या गिर्यारोहणात ज्याप्रमाणे ध्येयनिश्चिती करून मार्गक्रमण केले जाते, त्याप्रमाणे जीवनातही ध्येयनिश्चिती करण्याची सवय अंगी बाणली जाते. गिर्यारोहणात अंतिम टप्पा गाठल्यानंतर मागे वळून आपण स्वत: पार केलेले अंतर पाहिल्यास आपला स्वत:वरील विश्वास वाढून, आपल्या कार्यक्षमतेची जाणीव प्रकर्षाने होते. धैर्य, सयंम, ताकद, उत्साह इत्यादी गुणांची येथे कसोटी लागते. त्यामुळे, ध्येयप्राप्तीचा आनंद सुखावह आणि पुढील वाटचालीकरता प्रेरणादायी ठरतो.

## उतारा १७

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** (२)

**i.** **अरुणिमासोबत खंबीरपणे उभे राहणारे**

१ | २

SAMPLE CONTENT

ii. इतर (१) — **हात/पाय कापावा लागलेले पेशंट्स** — अरुणिमा (२)

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४० वरील (ओळ क्र. ५० ते ६१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[माझ्या, एव्हरेस्ट सर करण्याच्या................हे दाखवून द्यायला.....!]**

२. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. अरुणिमाच्या एव्हरेस्ट सर करण्याच्या प्रवासातील पहिला टप्पा ☐

ब. एव्हरेस्ट सर करणारी पहिली महिला ☐

ii. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

बचेंद्री पाल यांच्या मते अरुणिमाला एव्हरेस्ट का सर करायचे होते?

३. **व्याकरण**

**खालील वाक्यांत सूचनेनुसार बदल करा.** (२)

i. त्याच एकमेव अशा होत्या, की ज्यांनी माझ्या ध्येयाचा आदर केला. (नकारार्थी करा.)

ii. माझ्या, एव्हरेस्ट सर करण्याच्या निर्धाराचा जेव्हा मी उच्चार केला तेव्हा अगदी टोकाच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. (केवलवाक्य करा.)

*४. **स्वमत** (२)

अरुणिमाविषयी उठलेल्या खालील अफवेबाबत तुमची प्रतिक्रिया लिहा.

‘शरीराला जखमा झाल्यामुळे बहुधा अरुणिमाच्या डोक्यावरही परिणाम झालेला दिसतोय’

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. तिचे कुटुंब २. भाईसाब

ii. १. दिवसेंदिवस, महिनोन्महिने उठत नाहीत.

२. दोनच दिवसांत उभी राहिली.

२. i. अ. गिर्यारोहण प्रशिक्षण ब. बचेंद्री पाल

ii. बचेंद्री पाल यांच्या मते अरुणिमाला केवळ स्वत:ला सिद्ध करण्याकरता आणि जगाला ती कोण आहे हे दाखवून देण्याकरता एव्हरेस्ट सर करायचे होते.

SAMPLE CONTENT

३. i. त्याच एकमेव अशा होत्या, की ज्यांनी माझ्या ध्येयाचा अनादर केला नाही.

ii. माझ्या एव्हरेस्ट सर करण्याच्या निर्धाराचा मी उच्चार करताच अगदी टोकाच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या.

४. एका भयानक अपघातात आपला पाय गमावल्यानंतरही मोठ्या हिमतीने स्वत:ला सावरत अरुणिमाने एव्हरेस्ट सर करण्याचा निर्णय घेतला. जिथे उत्तम शरीर लाभलेल्या माणसांनाही एव्हरेस्ट सर करणे अशक्य वाटत असते, तिथे कृत्रिम पाय बसवलेला असताना अरुणिमाने हा निर्णय घेणे लोकांना वेडेपणाचे वाटले; त्यामुळे 'शरीराला जखमा झाल्यामुळे बहुधा अरुणिमाच्या डोक्यावर परिणाम झालेला दिसतोय' अशा अफवा तिच्याबद्दल उठल्या. वास्तविक पाहता प्रचंड जिद्दीने भारलेली अरुणिमा आपल्याला आलेल्या अपंगत्वावर मात करू पाहत होती. तिच्या या जिद्दीला, ध्येयासक्तीला हातभार लावून तिला प्रेरणा देणे आवश्यक होते; मात्र त्याविरुद्ध वागून, तिच्याबद्दल अफवा उठवून लोक तिचे मनोधैर्य खचवण्याचा प्रयत्न करत होते. ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. शरीरावर पर्यायाने मनावर आघात झालेल्या व्यक्तीला समाजाने जगण्याकरता प्रेरणा देणे, तिच्या स्वप्नांना बळ मिळवून देणे आवश्यक असते, असे मला वाटते.

## उतारा १८

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**नेहरू गिरीभ्रमण प्रशिक्षण केंद्रातील अरुणिमाचे खडतर अनुभव**

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४०, ४१ वरील (ओळ क्र.६२ ते ७१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**['नेहरू गिरिभ्रमण प्रशिक्षण......................एक रोमांचकारी लढाई!]**

**२. कारणे शोधा व लिहा.** **(२)**

i. चढाईच्या वेळी अरुणिमाला जमिनीत पाय घट्ट रोवणे कठीण होई, कारण...

ii. अरुणिमासोबत येण्याकरता शेरपा तयार नव्हता कारण...

**३. व्याकरण**

**i. अधोरेखित शब्दांची जात ओळखून प्रकार लिहा.** **(१)**

माझ्या कृत्रिम पायाची टाच व चवडा ज्यावेळी <u>मी</u> जमिनीत रुतवत असे त्या वेळी <u>ते</u> सतत गोल फिरत.

SAMPLE CONTENT

ii. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.** (१)

पायावर थोडा जरी दाब दिला गेला तर तीव्र वेदनांचे झटके बसत.

४. **स्वमत** (२)

वरील परिच्छेदातून अरुणिमाचा कोणता गुण दिसून येतो?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. छोट्या, पण धोकादायक पर्वतांची चढाई

२. मरणप्राय कठीण अनुभव

३. ध्येयापासून विचलित करू पाहणारे कष्टदायी प्रशिक्षण

४. चढाई करताना कृत्रिय पायामुळे होणाऱ्या वेदना व समस्या

**२.** i. अरुणिमाच्या कृत्रिम पायाची टाच व चवडा जमिनीवर रुतवला असता ते सतत गोल फिरत.

ii. जेथे धडधाकट माणसं गिरीभ्रमणास धजत नसत तेथे कृत्रिम पाय असणाऱ्या अरुणिमाला हे कितपत झेपेल असे साहजिकच शेरपाला वाटले.

**३.** i. मी - प्रथम पुरुषवाचक सर्वनाम

ते - तृतीय पुरुषवाचक सर्वनाम

ii. पायावर थोडा जरी दाब दिला गेला तर तीव्र **वेदनेचा झटका बसे.**

**४.** वरील परिच्छेदातून अरुणिमाचा जिद्दी स्वभाव दिसून येतो. आपल्याला आलेल्या अपंगत्वावर कृत्रिम पायाच्या साथीने मात करणारी अरुणिमा विलक्षण जिद्दीने झपाटली होती. धडधाकट माणसालाही अशक्य वाटावे असे गिरिभ्रमणाचे स्वप्न तिने पाहिले आणि ते पूर्ण करण्यासाठी अपार कष्ट सहन करत, प्रयत्न सुरू ठेवले. प्रशिक्षणाच्या वेळी होणाऱ्या मरणप्राय वेदना मागे सारत ती जिद्दीने आपल्या ध्येयाकडे सरसावताना दिसते. कष्टदायी प्रशिक्षणातून तावून सुलाखून बाहेर पडण्याच्या जिद्दीमुळे ती असह्य वेदनाही सहन करते. यातून ती शरीराने अपंग झाली असली तरी मनाने ती अव्यंग होती हे जाणवते. तिच्या मनाचा हा कणखरपणा, तिच्यात दाटलेली जिद्द, तिची ध्येयाप्रत पोहोचण्याकरता कोणतीही वेदना सहन करण्याची तयारी, चिकाटी या गुणांमुळे अरुणिमा इतरांपेक्षा वेगळी ठरते.

SAMPLE CONTENT

## उतारा १९

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

**गिर्यारोहणातून अरुणिमाला झालेले फायदे**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४१ वरील (ओळ क्र. ९१ ते १०३) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[लक, भाग्य, किस्मत,..............................अपयश म्हटलं जातं.]**

***२. i. खालील कृतीतून अभिव्यक्त होणारा अरुणिमाचा गुण लिहा.** (१)

ब्रिटिश माणसाने ओझे होते म्हणून फेकून दिलेला ऑक्सिजन सिलेंडर अरुणिमाने वापरला.

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

अरुणिमा कोणत्या शब्दांना मानत नाही?

**३. व्याकरण**

**खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय ओळखून विभक्ती लिहा.** (२)

| शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|
| माझ्यात | | |
| मित्रांनो | | |

**४. स्वमत** (२)

'आपलं ध्येय साध्य करताना प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नसते', या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. आत्मविश्वास जागा झाला २. नेतृत्वगुणाचे धडे मिळाले
३. गटबांधणीचे धडे मिळाले ४. पोलादी कणखरपणा निर्माण झाला

**२.** i. प्रसंगावधान
ii. अरुणिमा लक, भाग्य, किस्मत, डेस्टिनी या भाकड शब्दांना मानत नाही.

३.

| शब्द | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|
| माझ्यात | **त** | **सप्तमी** |
| मित्रांनो | **नो** | **संबोधन** |

४. कोणतीही गोष्ट साध्य करण्याच्या मार्गातील ध्येयनिश्चिती हा पहिला टप्पा ठरतो. ध्येय निश्चित झाल्यानंतर तेथपर्यंत पोहोचण्याकरता प्रयत्नांची आवश्यकता भासते. या प्रवासात अनेक अडथळे, अडचणी येतच राहतात; मात्र त्यांचा सामना करत त्यातून मार्ग काढणे, पुढे जाणे हे आपणास ध्येयप्राप्तीपर्यंत नेऊन पोहोचवते. ध्येयप्राप्तीच्या या मार्गात काही वेळा अपयशही पदरी पडते; मात्र हे अपयश म्हणजे अंत नसतो. अपयश झेलून हताश न होता नव्या जोमाने चालण्यास प्रारंभ करणे आवश्यक ठरते. या अपयशातूनच आपल्याला आपली चूक कळते. अपयशामागील कारणे शोधून त्यातून योग्य तो बोध घेत पुढच्या वेळी ती चूक टाळून यश निश्चितच मिळवता येते. त्या अपयशातून सकारात्मक प्रेरणा घेऊन अधिक जोमाने प्रयत्न केल्यास ध्येयप्राप्ती निश्चितच करता येते, म्हणूनच ध्येयप्राप्तीकरता केलेले प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नसत, तर ती यशाची पहिली पायरी असते.

# पाठ १३: कर्ते सुधारक कर्वे

## उतारा २०

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

*i. १ — **महर्षी कर्वे यांना अपेक्षित असलेले स्वातंत्र्य प्रकार** — २

ii. १ — **स्त्रीशिक्षणाचे असिधाराव्रत परिपूर्ण होण्यासाठी कर्वेंना आवश्यक वाटलेले गुण** — २

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४८ वरील (ओळ क्र. ६ ते १८) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[स्वातंत्र्यसमराच्या ऐन..............................येईल, हे कळत होते.]**

SAMPLE CONTENT

*२. **उताऱ्याच्या आधारे वाक्यांचा उर्वरित भाग लिहून वाक्ये पूर्ण करा.** (२)

i. स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे म्हणजे...

ii. समाजाविरुद्ध विद्रोह केला तर...

३. **व्याकरण**

i. **खालील वाक्यांतील कोणतीही दोन उभयान्वयी अव्यये ओळखा व लिहा.** (१)

तिला स्वतंत्र व्हायचे असेल तर तिला भान यावयास हवे, की आपण गुलाम आहोत आणि हे भान शिक्षणाशिवाय येऊ शकत नाही.

ii. **वरील परिच्छेदातील कोणतीही दोन क्रियाविशेषण अव्यये लिहा.** (१)

४. **स्वमत** (२)

स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे म्हणजे खडकावर डोके आपटण्यासारखे होते, या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. राष्ट्रीय स्वातंत्र्य २. संपूर्ण स्वातंत्र्य

ii. १. शांत सोशिकपणा २. सहिष्णू वृत्ती

२. i. स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे म्हणजे **खडकावर डोके आपटण्यासारखे होते.**

ii. समाजाविरुद्ध विद्रोह केला तर **समाज आपल्याला गिळून टाकायला येईल, हे कळत होते.**

३. i. की, आणि ii. ठामपणे, हमखास

४. स्वातंत्र्यपूर्वकाळात समाज रूढी, परंपरांच्या जाळ्यात अडकलेला होता. स्त्री गुलाम आहे अशी विचारधारा समाजात रूढ होती. स्वत: स्त्रियांनाही स्वत:वर होणाऱ्या अन्यायाची तिळमात्रही जाणीव नव्हती. या जंजाळातून बाहेर पडण्याची मानसिकताच समाजात रूढ नव्हती. त्यामुळे, स्त्रियांना त्यांच्या स्वातंत्र्याची जाणीव करून देणे, त्यांना शिक्षणाकरता प्रेरित करणे हे त्या काळात अत्यंत जोखमीचे, अतिशय कठीण काम होते. या कार्याला समाजाचा कडाडून विरोध होणार हे निश्चित होते. समाजाविरुद्ध उभे राहिल्यास त्यातून यश कितपत मिळेल याची शाश्वती नव्हती. उलट या लढाईत स्वत:लाच नुकसान भोगावे लागण्याची शक्यता होती. त्यामुळे, स्त्री स्वातंत्र्याकरता झगडणे म्हणजे आपले डोके खडकावर आपटण्यासारखेच होते.

SAMPLE COPY

## उतारा २१

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. i. आकृती पूर्ण करा.** **(१)**

असा नसावा — **खरा सुधारक** — असा असावा

असा नसावा → १

असा असावा → २

**ii. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ. लेखकाच्या मते दुसऱ्याच्या दु:खात दु:खी व सुखात सुखी होणारा

ब. गणिताचा गुणधर्म

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४९ वरील (ओळ क्र. ३५ ते ४७) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[वस्तुत: समाज सुस्वरूप ........................त्यांना घालवायचा होता.]**

**२. ओघतक्ता पूर्ण करा.** **(२)**

*महर्षी कर्वे यांच्या कार्यकुशलतेचा ओघतक्ता तयार करा.

**कार्यात नेमकेपणा होता**

↓

१

↓

२

↓

**विचार पक्का झाला की**

↓

३

↓

४

**३. व्याकरण**

**i. दिलेल्या सूचनेनुसार वाक्य परिवर्तन करा.** **(१)**

विचार पक्का झाला, की आचरणात आणत. (आज्ञार्थी करा.)

**ii. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **(१)**
**(केवलवाक्य, संयुक्तवाक्य, मिश्रवाक्य)**

अ. वस्तुत: समाज सुस्वरूप करण्याची महर्षी कर्वे यांची जिद्द होती; पण त्या जिद्दीने कुटुंबाला कुठेही कुरूप केले नाही.

ब. विचार पक्का झाला, की आचरणात आणत.

**४. स्वमत** **(२)**

'स्त्रियांनी शिकणे अत्यंत गरजेचे आहे', या विधानामागील महर्षी कर्वे यांचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. बोलका  २. कर्ता
ii. १. स्थितप्रज्ञ  २. नेमकेपणा

**२.** १. ते बोलत नसत
२. विचार करत
३. आचरणात आणत
४. त्यांच्या कार्यातूनच त्यांच्या चित्तात काय चालले आहे ते लोकांना समजे

**३.** i. विचार पक्का झाला, की आचरणात आणा.
ii. अ. संयुक्त वाक्य  ब. मिश्र वाक्य

**४.** स्वातंत्र्यपूर्वकाळात समाजात स्त्रीचे स्थान फारसे महत्त्वाचे नव्हते. तिला गुलामासारखे वागवले जात असे; मात्र तिच्यावर होणाऱ्या या अन्यायाची तिला कल्पनाच नव्हती. परिणामी, आपल्यावर अन्याय होतोय व त्या अन्यायाविरोधात लढा दिला पाहिजे ही जाणीवच स्त्रियांमध्ये नव्हती. वरून सुंदर वाटणारे स्त्रियांचे जीवन आतून मात्र पोखरलेले होते. अशा पारतंत्र्यातून बाहेर पडण्याकरता स्त्रीला आत्मभान येणे गरजेचे होते. तिचा स्वाभिमान जागृत होणे आवश्यक होते आणि ते केवळ शिक्षणामुळेच शक्य होते. शिक्षणामुळेच स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळवू शकणार होत्या, त्या आत्मनिर्भर होणार होत्या. त्याचबरोबर, समाजाचं अर्धांग असणाऱ्या स्त्रिया अशिक्षित राहणं हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उचित नव्हतं. त्यामुळेच महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाचा आग्रह धरला.

SAMPLE CONTENT

## उतारा २२

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** (२)

महर्षी कर्वे यांची स्त्रियांबाबतची स्वप्ने

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४९ वरील (ओळ क्र.४७ ते ५८) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[महर्षी धोंडो केशव.....................................डोक्यावर घेतले.]**

२. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. कर्वे यांना लोकमानसाने दिलेली पदवी

ब. राजमानसाने महर्षी कर्वे यांना दिलेला सर्वोच्च नागरी पुरस्कार

ii. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

पुरुषप्रधान संस्कृतीत कोणते काम महाकठीण होते?

३. **व्याकरण**

i. **खालील वाक्याचा सूचनेनुसार काळ बदला.** (१)

महर्षी कर्व्यांनी जगप्रवास करून स्त्रीशिक्षणाचे माहात्म्य सर्वत्र बिंबवले.
(अपूर्ण भूतकाळ करा.)

ii. **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दाची जात ओळखून लिहा.** (१)

अ. महर्षी कर्व्यांनी जगभर स्त्रीशिक्षणाबद्दल सभा <u>केल्या</u>.

ब. गुरुत्वाकर्षणाविरुद्ध पृथ्वी<u>बाहेर</u> पडणाऱ्या रॉकेटसारखीच क्षमता तेथे आवश्यक होती.

४. **स्वमत** (२)

'पूर्वी स्त्री-पुरुषांमध्ये केला जाणारा भेदभाव आज कमी झाला आहे' असे तुम्हांला वाटते का?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. स्त्री ही स्वाभिमानी असली पाहिजे

२. स्त्री शिकली पाहिजे

३. स्त्री उच्चविद्याविभूषित झाली पाहिजे

४. ती पुरुषांशी स्पर्धा करू शकली पाहिजे

**२.** i. अ. महर्षी ब. भारतरत्न

ii. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांवरील पारतंत्र्याचे जोखड उखडून टाकणे हे काम महाकठीण होते.

**३.** i. महर्षी कर्वे जगप्रवास करून स्त्रीशिक्षणाचे माहात्म्य सर्वत्र बिंबवत होते.

ii. अ. केल्या – सकर्मक क्रियापद

ब. बाहेर – शब्दयोगी अव्यय

**४.** पूर्वी स्त्री पुरुषांमध्ये केला जाणारा भेदभाव आता बऱ्याच अंशी कमी झाला आहे असे मला वाटते. पूर्वी स्त्रियांना शिक्षणाचा, समाजात पुरुषांच्या बरोबरीने वागण्याचा अधिकार नव्हता. परिणामी, स्त्री परावलंबी होती व पारतंत्र्यात जगत होती; मात्र आता ही परिस्थिती बदलली असून आज स्त्री सुशिक्षित होऊ लागली आहे, मुक्तपणे समाजात वावरत आहे. ती आत्मनिर्भर व स्वावलंबी झाली आहे. आपल्या कर्तृत्वाने तिने सामाजिक, राजकीय, क्रीडा, आर्थिक, शैक्षणिक अशी सगळीच क्षेत्रं काबीज केली आहेत. अर्थात अजूनही हे चित्र परिपूर्ण झाले आहे असं म्हणता येणार नाही. आजही अनेक ठिकाणी स्त्री पुरुषांपेक्षा दुय्यम समजण्याच्या घटना घडताना दिसतात; मात्र पूर्वीच्या काळच्या तुलनेने हा भेदभाव खूप प्रमाणात कमी झाला आहे असे नक्कीच म्हणता येईल.

# पाठ १४ : काळे केस

## उतारा २३

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. ***i. आकृती पूर्ण करा.** **(१)**

१ — **लेखक सर्वकाळ विचार करताना शोध घेणाऱ्या गोष्टी** — २

**ii. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ. लेखकाची विचार करण्याची आवडती वेळ ☐

ब. ही वेळ वगळता लेखक सदासर्वकाळ विचारच करत असतात. ☐

SAMPLE CONTENT

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५३ वरील (ओळ क्र. ४० ते ५०) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[माझं उत्तर तयार................................ नवे विचार सुचतातही!]**

२. i. **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** (१)
सकाळच्या वेळी लेखकाला ________
अ. नव नवे विचार सुचतातही! ब. सारखी झोप येते.
क. फिरायला जायचे असते. ड. चांगले विचार सुचतच नाहीत.

ii. **कारण शोधा व लिहा.** (१)
माझी विचार करण्याची वेळ कोणती असं मला विचारू नका असे लेखक म्हणतो कारण......

३. **व्याकरण**
i. **वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखून त्यांचा प्रकार लिहा.** (१)
उत्तर थोडंसं चमत्कारिक आहे; पण ते तुम्हांला सांगायला हरकत नाही.
ii. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** (१)
माझं जे उत्तर आहे तेच इतर लेखक देतील की नाही कोणास ठाऊक?

४. **स्वमत** (२)
*प्रत्येकाची विचार करण्याची सवय आणि वेळ स्वतंत्र असते, याबाबत तुमचा विचार स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ)**

**१.** i. १. नवनव्या कल्पनांचा शोध घेणे
२. अर्धवट सुचलेल्या कल्पनांच्या आकृती पूर्ण करणे
ii. अ. सकाळी दाढी करण्याची ब. गाढ झोपेची

**२.** i. सकाळच्या वेळी लेखकाला **नवनवे विचार सुचतातही.**
ii. लेखक एका विशिष्ट वेळी नाही तर सदा सर्वकाळ विचार करत असतो.

**३.** i. उत्तर – सामान्यनाम ते – तृतीय पुरुषवाचक सर्वनाम
ii. माझं जे उत्तर आहे तेच इतर **लेखिका** देतील की नाही कोणास ठाऊक?

SAMPLE CONTENT

४. ‘व्यक्ती तितक्या प्रकृती’ असं म्हटलं जातं. कोणत्याही दोन व्यक्तींचे स्वभाव, जडणघडण, विचारसरणी, सवयी या भिन्न असू शकतात. एखाद्या व्यक्तीला आवडणारी, भावणारी गोष्ट दुसऱ्या व्यक्तीला आवडेलच असे नाही. प्रत्येकाची मनाला शांती मिळवून देण्याची, विचारप्रवण करण्याची पद्धतही त्याच्या स्वभावधर्मानुसार निरनिराळी असते. त्याप्रमाणेच विचार करण्याची प्रत्येकाची वेळ व सवयही वेगवेगळी असणे स्वाभाविक आहे. उदाहरणार्थ, कुणा व्यक्तीला पहाटेच्या शांत वातावरणात विचार करायला आवडत असेल, विचार सुचतही असतील, तर दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला रात्री निवांत विचार करायला आवडत असेल. एखाद्या व्यक्तीला विचार करण्यासाठी एकांताची, शांततेची गरज असते, तर काही व्यक्तींना अगदी ट्रेनच्या गर्दीतही विचार सुचू शकतात. म्हणजेच विचार करण्याची सवय व वेळ ही व्यक्तिपरत्वे भिन्न असू शकते असे मला वाटते.

## उतारा २४

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** (२)

**तिसऱ्या मजल्यावरून पावसाळ्यात लेखकाला दिसलेली दृश्ये**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.५३ वरील (ओळ क्र. ५१ ते ६१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[मी सकाळी उशिरा उठतो......................माखवायला प्रारंभ करतो!]**

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** (२)

i. लेखकाच्या घराबाहेर सकाळी कसले आवाज ऐकू येतात?

ii. कोणता देखावा लेखकाला मुक्या शब्दांनी नमस्ते म्हणतो?

**३. व्याकरण**

**खालील विशेषणांचे प्रकार ओळखा.** (२)

**तिसरा** मजला, **धूसर** दिशा, **तो** देखावा, **ताजी** झिलई

**४. स्वमत** (२)

लेखकाने ज्याप्रमाणे निसर्गाशी संवाद साधला आहे त्याप्रमाणे तुम्ही कधी निसर्गाशी संवाद साधला आहे का? तुमचा अनुभव लिहा.

SAMPLE CONTENT

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ)**

**१.** १. समोर उजव्या बाजूच्या भिंतीच्या व कौलारांच्या उंच-सखल आडव्या-उभ्या रांगा

२. धूसर झालेल्या दिशा

३. पावसाची नाजूक झिमझिम

४. गर्जणारी वृष्टी

**२.** i. लेखकाच्या घराबाहेर सकाळी वाहनांचे, फेरीवाल्यांचे, संभाषणांचे, आयांनी लहान मुलांना मारलेल्या हाकांचे आवाज ऐकू येतात.

ii. प्रकाशाने ताजी झिलई दिलेल्या झाडांच्या, जमिनीच्या व टेकड्यांच्या रंगाच्या चमचमीचा देखावा लेखकाला मुक्या शब्दांनी नमस्ते म्हणतो.

**३.** तिसरा – संख्याविशेषण,

धूसर – गुणविशेषण

तो – सार्वनामिक विशेषण,

ताजी – गुणविशेषण

**४.** अनेक दिवस सराव केल्यानंतरही राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्याच फेरीत मी हरलो होतो. हताश मन:स्थितीमुळे रात्री झोपच लागत नव्हती. पहाटे पहाटे अचानक खिडकीच्या काचेवर पक्ष्यांच्या चोचीच्या टकटक अवाजाने मी बाहेर पाहिले तर डोंगराआडून सूर्याचे हलकेसे कोवळे किरण सर्वत्र पसरत होते. धट धुक्याच्या चादरीतून वाट काढत ही किरणे माझ्यापर्यंत पोहोचत होती. माझ्या मनावरचा धुक्याचा थर बाजूला करून जणू ती मला जागवत होती. अंधारापलीकडे, धुक्यापलीकडे प्रकाश असतो, तेव्हा मी आशा कायम ठेवावी हेच जणू ती किरणे मला सांगत होती. सूर्यकिरणांनी उजळलेली ती सृष्टी, नव्या दिवसाची सुरुवात होताच आपापल्या कामाला लागलेले पक्षी पाहून मलाही नव्याने सरावाला सुरुवात करण्याची प्रेरणा मिळाली. खिडकीवर टकटक करणारे ते पक्षी जणू माझ्यासाठी निसर्गाचा हाच निरोप घेऊन आले होते. त्याकरता त्यांचे आभार मानत मी सरावासाठी सज्ज झालो.

SAMPLE CONTENT

# पाठ १७ : सोनाली

## उतारा २५

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. i. **आकृती पूर्ण करा.** (१)

| लेखकाने निवडलेल्या पिलाची वैशिष्ट्ये | | |
|---|---|---|
| १ | कमी फिसकारणारं | २ |

ii. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. वाघ-सिंह पूर्ण ताकदीचे होण्याकरता लागणारा कालावधी ☐

ब. रूपालीनंतर १५ दिवसांनी आगमन झालेली ☐

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.६७ वरील (ओळ क्र. ७ ते १६) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[तिन्ही बछड्यांना जन्मून........................नाव 'रूपाली' ठेवलं होतं.]**

२. i. **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** (१)

लेखक आज पशूमधील पशुत्वाची ________.

अ. पूजा करायला निघाला नव्हता. ब. शिकार करायला तयार नव्हता.
क. शिकार करायला निघाला होता. ड. सेवा करत होता.

ii. **कारण शोधा व लिहा.** (१)

लेखकाने त्याच्या कुत्रीचे नाव 'रूपाली' असे ठेवले होते, कारण .....

३. **व्याकरण**

i. **खाली दिलेल्या सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.** (१)

मी तिन्ही पिल्लांना गोंजारलं, पण सगळीच फिसकन अंगावर आली. (केवलवाक्य बनवा.)

ii. **अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** (१)

रात्रभर प्रवासात माझ्या मनात त्या छाव्याशिवाय दुसरा कशाचाच विचारर नव्हता.

४. **स्वमत** (२)

लेखकाप्रमाणे तुम्ही कधी एखाद्या प्राण्यावर प्रेम केले आहे का?



SAMPLE

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. शांत स्वभावाचं २. सशक्त
ii. अ. दोन वर्षं ब. सिंहकन्या

२. i. लेखक आज पशूमधील पशुत्वाची **शिकार करायला निघाला होता.**
ii. लेखकाने आणलेल्या कुत्रीचे केस रुपेरी होते.

३. i. मी तिन्ही पिल्लांना गोंजारताच ती सगळीच फिसकन अंगावर आली.
ii. रात्रभर – कालवाचक क्रियाविशेषण अव्यय
छाव्या<u>शिवाय</u> – शब्दयोगी अव्यय

४. हो. काही महिन्यांपूर्वी माझ्या मित्राच्या घरी असलेल्या मांजरीने तीन पिल्लांना जन्म दिला. जागेच्या अभावामुळे मित्राच्या कुटुंबियांनी आम्हा मित्रांकडे एकेक पिल्लू दिले. ते कबऱ्या रंगाचे पिल्लू हातात घेताच एका वेगळ्याच बंधाने आम्ही एकमेकांशी जोडले गेलो. घरी नेताच घरच्यांनीही या नव्या पाहुण्याचे स्वागतच केले. घरात येताच त्याला दूध पिण्यास दिले. जिभेने दूध चट्टामट्टा करत ते अलगद माझ्या कुशीत शिरले. तेव्हापासून अधिकाधिक वेळ ते माझ्यासोबत राहू लागले. त्याच्या खाण्याच्या वेळा सांभाळणे, त्याला बाहेर घेऊन जाणे, हे आता नित्याचेच झाले आहे. तोही मला बसस्टॉपपर्यंत आवर्जून सोडायला येतो. मी गोंजारल्याशिवाय तो झोपतही नाही. एकदा मी आजोळी गेलो असता त्याने दिवसभर काहीही खाल्ले नाही. मी परतलो तेव्हा त्याने माझ्या हातूनच दूध प्यायले. मी आजारी पडलो तरीही ते माझ्या शेजारी शांतपणे बसून राहतं. जणू माझी काळजी त्याला सतावत असते. अशा या मनीच्या पिल्लाचे आणि माझे नाते फार घट्ट होत गेले आहे.

## उतारा २६

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**सोनाली आणि रूपाली यांची झोपण्यापूर्वीची दंगामस्ती**

१ २ ३ ४

SAMPLE CONTENT

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.६७,६८ वरील (ओळ क्र. २२ ते ३३) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[सुरुवातीला रूपालीचं.................................जागा मिळत नसे.]**

२. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. चटकन न झोपणारी ☐

ब. सोनालीला थोपटून झोपवणारा ☐

ii. **कारण शोधा व लिहा.** (१)

हिंडताना रूपाली पुढे व सोनाली मागे असे, कारण .....

३. **व्याकरण**

i. **खाली दिलेल्या सूचनेनुसार वाक्याचा काळ बदला.** (१)

रूपाली सोनालीवर भुंकायची. (साधा भविष्यकाळ करा.)

ii. **खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यय ओळखा.** (१)

अ. तीन चार दिवस हा प्रकार चालू होता; पण चार दिवसांनंतर दोघींचीही गट्टी जमली.

ब. हिंडताना रूपाली पुढे व सोनाली मागे.

४. **स्वमत** (२)

रूपाली व सोनाली यांचे बदलत गेलेले नाते परिच्छेदाच्या आधारे स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ)**

१. १. सोनाली लेखकाचे तोंड व केस चाटे
२. सोनाली पंजाने लेखकाचे केस विस्कटून टाकी
३. सोनाली व रूपाली बिछान्यात एकत्र नाचत
४. दोघी एकत्र कुदत

२. i. अ. सोनाली ब. लेखक

ii. रूपाली सीनियर असल्यामुळे पुढे राहण्याचा मान तिचाच होता.

३. i. रूपाली सोनालीवर भुंकेल.

ii. अ. पण ब. व

SAMPLE

४. रूपाली आणि सोनाली हे वेगवेगळ्या प्रजातीतील प्राणी असल्याने त्यांच्यात कोणतेही नाते झटकन जुळणे अवघडच होते. त्यामुळे, दोघीही आपापल्या तोऱ्यात असत. सुरुवातीला आपापली नाराजी त्या आपापल्या पद्धतीने व्यक्त करत. एकमेकांशी पटवून घेणे तर त्यांना जमतच नव्हते; पण आपल्यातील हे वेगळेपण, आपल्यातील अंतर दोघीही थोड्याच दिवसांत विसरल्या आणि त्यांच्या मैत्रीचा अनोखा प्रवास सुरू झाला. पुढे दोघींनाही एकमेकींवाचून करमेनासे झाले. एकत्र खोड्या करण्यात त्यांचे दिवस व्यतीत होऊ लागले. दंगामस्ती, नाचणे, खाणे, झोपणे या साऱ्याच गोष्टी आपल्यातील भेद विसरून एकत्र करू लागल्या. त्या दोघींमध्ये एक निराळाच भावबंध तयार झाला होता. वेगळ्या प्राण्यांमध्ये फुललेले हे मैत्रीचे, जिव्हाळ्याचे नाते मोठे मनोवेधक वाटते.

## उतारा २७

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** (२)

**i.**

**यांचा सामना पाहताना लेखकाला भान राहत नसे**

१ | श्वानकन्या | २

**ii.**

१ — **अल्सेशियन कुत्र्याचे विशेष** — २

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र .६८ वरील (ओळ क्र. ४१ ते ५२) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[मुंबईहून दोघींसाठी..................................पाहून मजा वाटली.]**

**२. खालील घटनांचे / कृतींचे परिणाम लिहा.** (२)

i. जनावरांना लहानपणापासून साखळीची सवय लावली नाही.

ii. अल्सेशियन कुत्रा सोनालीच्या अंगावर धावला.

**३. खालील शब्दांना लागलेले विभक्ती प्रत्यय व विभक्ती लिहा.** (२)

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| **i.** | दोघींना | | |
| **ii.** | सज्जाचा | | |

**४. स्वमत** **(२)**

अल्सेशियन कुत्रा व सोनाली यांच्या भेटीच्या प्रसंगातून सोनालीचे कोणते गुण दिसून येतात?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. सिंहकन्या २. डॉक्टर कन्या

ii. १. चांगला उंच २. दांडगा

**२.** i. परिणामी मोठेपणी ही जनावरं स्वत:ला साखळी घालू देत नाहीत.

ii. परिणामी सोनाली किंचितही न घाबरता 'फिस' करून त्याच्या अंगावर धावली व त्या पळणाऱ्या कुत्र्याचा पाठलाग करू लागली.

**३.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| i. | दोघींना | **ना** | **द्‌वितीया** |
| ii. | सज्जाचा | **चा** | **षष्ठी** |

**४.** अल्सेशियन कुत्र्याने सोनाली या सिंहकन्येला मांजराचे पिल्लू समजून तिच्या अंगावर धाव घेतली; मात्र आकाराने लहान असली तरीही मुळात ती सिंहीण होती. त्यामुळे, आपल्यापेक्षा आकाराने प्रचंड असणाऱ्या त्या कुत्र्याला अंगावर झेपावताना पाहूनही ती घाबरली नाही. उलट निडरपणे आवाज करत ती पूर्ण ताकदीने त्याच्या अंगावर धावली. तिचा हा आवेश पाहून तो कुत्राही घाबरला व पळू लागला. सिंहिणीतील मुळात असणारी आक्रमकता अचानकपणे बाहेर आलेली दिसून आली. सिंहिणीमध्ये अंगभूत असलेल्या धाडसामुळे मोठ्या शत्रूचा सामना करण्याची तयारी तिने दाखवली. सोनालीतील धैर्य, निडरपणा, या गुणांची या प्रसंगातून प्रचिती येते.

SAMPLE CONTENT

## उतारा २८

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. i. आकृती पूर्ण करा.** (१)

१ — **सोनालीचा यांच्यावर जीव होता** — २

***ii. पुढील घटना केव्हा घडली ते लिहा.** (१)

सोनाली गृहस्थाच्या अंगावर धावली.

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.६९,७० वरील (ओळ क्र. ९२ ते १०१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[सोनालीच्या दातांत विलक्षण.....................दीपालीला तेथेच टाकलं.]**

**२. ओघतक्ता पूर्ण करा.** (२)

**लेखकाने सोनालीला पितळी पातेल्यातून दूध प्यायला दिले**
↓
१
↓
२
↓
३
↓
**रात्रभर तिची पातेल्याशी मस्ती चालू होती**
↓
४
↓
**सोनालीने त्या पातेल्याची चाळणी केली होती**

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यातील सर्वनाम ओळखून त्याचा प्रकार लिहा.** (१)

एकदा नेहमीप्रमाणे सोनालीला मी रात्री पितळी पातेल्यामधून दूध प्यायला दिले.

ii. **खालील वाक्यांचे प्रकार ओळखा. (विधानार्थी/आज्ञार्थी/उद्गारार्थी/प्रश्नार्थी)** (१)

अ. "छोना, छोना तू काय कत्ते?"

ब. सोनालीच्या दातांत विलक्षण ताकद आली होती.

४. **स्वमत** (२)

सोनालीचे गृहस्थावर धावून जाणे काय सूचित करते असे तुम्हांला वाटते?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. रूपाली २. दीपाली

ii. दीपाली व सोनाली खेळत असताना तेथे आलेल्या गृहस्थाने ती पोर या सिंहिणीपाशी चुकून आली आहे असे वाटून दीपालीला उचलले. दीपालीच्या काळजीने त्यावेळी सोनाली गृहस्थाच्या अंगावर धावली.

२. १. कोणीतरी आलं म्हणून लेखक तसाच उठला

२. लेखक पातेलं परत न्यायचा विसरला

३. सोनालीने दूध पिऊन झाल्यानंतर पातेलं चावायला सुरुवात केली

४. सकाळी उठल्यावर लेखक गच्चीवर गेला

३. i. मी – प्रथम पुरुषवाचक सर्वनाम

ii. अ. प्रश्नार्थी वाक्य ब. विधानार्थी वाक्य

४. सोनाली सिंहिणीला व दीपाली या लहान मुलीला एकत्र पाहून हे लहान मूल चुकून सिंहिणीजवळ गेले आहे असे गृहस्थाला वाटले. त्याने दीपालीला झटकन उचलताच सोनाली त्याच्यावर धावून गेली. या प्रसंगातून सोनाली आणि दीपाली यांचे भावबंध अधोरेखित होतात. सोनाली ही सिंहीण असूनही लेखकाच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला ती आपले मानत असे लेखकाच्या कुटुंबाचा तीही एक हिस्सा बनली होती. ज्याप्रमाणे आपल्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीवर संकट आल्यावर कुटुंबातील इतर व्यक्ती तिचे रक्षण करण्यास सरसावतात, त्याप्रमाणे सोनालीही दीपालीच्या सुरक्षेविषयी चिंतित होऊन तिच्या रक्षणार्थ त्या गृहस्थावर धावून गेली. यामागे केवळ आपल्या कुटुंबाची सुरक्षा हाच हेतू असल्याचे जाणवते. आपल्या कुटुंबाप्रती तिच्या मनात असलेली काळजी, जबाबदारी यातून दिसून येते. यातून प्राण्यांमध्येही भावभावना असतात हे स्पष्ट होते.

SAMPLE CONTENT

# पाठ १८ : निर्णय

## उतारा २९

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** (२)

**दुकानातील रोबोची वैशिष्ट्ये**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.७४ वरील (ओळ क्र. १ ते ११) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[न्यू एज रोबो कंपनीचा............................विचार करू लागलो.]**

**२. i. चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. रोबोज तयार करणारी कंपनी ☐

ब. विज्ञान – तंत्रज्ञानाचा चमत्कार ☐

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

हॉटेल व्यवसायाच्या गरजा लक्षात घेऊन न्यू एज रोबो कंपनीने कोणते यंत्रमानव बनवले?

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांचे प्रकार ओळखा.**
**(विधानार्थी/प्रश्नार्थी/उद्गारार्थी/आज्ञार्थी)** (१)

अ. "राजाभाऊ, उठा आता,"

ब. "रोबो वेटरची सर्व कामं करणं कसं शक्य आहे?"

**ii. खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा व लिहा.** (१)

अ. एजंट आम्हांला लॅपटॉपवर माहिती सांगत होता.

ब. लाखाची गोष्ट निघाल्याबरोबर सोमनाथ पटकन उठला.

**४. स्वमत** (२)

'यंत्रमानवाचा शोध हे मानवासाठी वरदान ठरले आहे' या विधानाबाबत तुमचे मत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. हुबेहुब माणसाप्रमाणे दिसणारे
२. माणसाप्रमाणे वागणारे
३. खाण्यापिण्याचा, पगाराचा, कामचुकारपणाचा प्रश्नच नसणारे
४. मानवी वेटरपेक्षा दुप्पट काम करून दुप्पट कमाई करून देणारे

**२.** i. अ. न्यू एज रोबो कंपनी ब. रोबोज
ii. हॉटेल व्यवसायाच्या गरजा लक्षात घेऊन न्यू एज रोबो कंपनीने वेटर, आचारी, स्वीपर, मॅनेजर असे यंत्रमानव बनवले.

**३.** i. अ. आज्ञार्थी वाक्य ब. प्रश्नार्थी वाक्य
ii. अ. लॅपटॉपवर ब. निघाल्याबरोबर

**४.** मानवाने तंत्रज्ञानाच्या मदतीने केलेली प्रगती यंत्रमानवाच्या रूपात प्रत्यक्ष निदर्शनास येते. मानवाप्रमाणे वागणारा, बोलणारा यंत्रमानव मानवाला अशक्य वाटणारी, मानवी क्षमतेपेक्षा अधिक क्षमतेची आवश्यकता असणारी कामे सहजगत्या करू शकतो. मानवाला असणाऱ्या शारीरिक, मानसिक मर्यादा या यंत्रमानवाला नसल्याने कामात अडथळा निर्माण होत नाही. प्रतिकूल परिस्थितीत जेथे मानव काम करू शकत नाही, अशा ठिकाणी या रोबोंची मदत घेऊन कार्य सुरळीतपणे चालू ठेवता येते; मात्र मानवाने तयार केलेल्या या यंत्रमानवाच्याही मर्यादा लक्षात घ्याव्या लागतात. मानवी भावभावनांचा अभाव असलेले, यांत्रिक बिघाड होऊ शकणारे हे रोबो काही वेळा हानिकारकही ठरू शकतील हे मात्र तितकेच खरे आहे, म्हणूनच योग्य नियंत्रणाखाली वापर केल्यास यंत्रमानवाचा शोध हे मानवासाठी नक्कीच वरदान आहे.

## उतारा ३०

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. *i. आकृती पूर्ण करा.** **(१)**

१ — **हॉटेलमधील मनोज या वेटरच्या अंगचे गुण** — २

SAMPLE CONTENT

ii. **रोबोंना कामाकरता सज्ज करण्याच्या कृतींच्या घटनाक्रमाचा ओघतक्ता तयार करा.** **(१)**

| |
|---|
| **रात्री अकरा ते सकाळी सहापर्यंत चार्जिंग करणे** |
| ↓ **सकाळी सहा वाजता** |
| **१** |
| ↓ **त्यानंतर** |
| **२** |

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.७४,७५ वरील (ओळ क्र. १२ ते ३१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[मी आणि माझा बालमित्र.......................म्हणून कामाला लागायचे.]**

२. i. **चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ. लेखकाच्या हॉटेलचे नाव

ब. लेखकाचा बालमित्र

*ii. **कारण लिहा.** **(१)**

हॉटेल मालकाने चार रोबो खरेदी केले, कारण ...

३. **व्याकरण**

i. **खालील वाक्यांचे काळ ओळखा.** **(१)**

अ. मी आणि माझा बालमित्र दोघे मिळून गेली चार वर्षे हॉटेल चालवतो आहोत.

ब. वेटरचा प्रश्न कायमचा निकालात काढण्यासाठी आम्ही चार रोबो वेटर खरेदी केले.

ii. **दिलेल्या उताऱ्यातील कोणतीही दोन भाववाचक नामे शोधा व लिहा.** **(१)**

४. **स्वमत** **(२)**

'वाळवंटातील हिरवळ' या शब्दाचा उताऱ्याच्या संदर्भात तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. प्रामाणिकपणा २. प्रसंगावधान

ii. १. त्यांच्या अंगावर कडक इस्त्रीचे कपडे चढवणे

२. डाव्या खांद्यावरील पॉवर स्वीच सुरू करणे

२. i. अ. हॉटेल हेरिटेज ब. सोमनाथ ऊर्फ सोमा

ii. हॉटेलमधील वेटरचा कामचुकारपणा, दांड्या मारणे, भांडणं यांना कंटाळलेल्या हॉटेल मालकांना वेटरचा प्रश्न निकालात काढायचा होता.

३. i. अ. अपूर्ण वर्तमानकाळ ब. साधा भूतकाळ

ii. कामचुकारपणा, प्रामाणिकपणा

४. वाळवंट म्हटले, की डोळ्यांसमोर उभा राहते तो उष्ण, शुष्क, वाळूने भरलेला, पाण्याचे दुर्भिक्ष असलेला, कोरडा, रखरखीत प्रदेश. अशा प्रदेशात पाण्याअभावी सजीवांची, हिरव्या झाडाझुडपांची कमतरताच आढळते. त्यामुळे, मनाला सुखावणारे' जीवनाची आशा पल्लवित करणारे अनुभव क्वचितच तेथे येतात. वाळूच्या या रखरखाटात अशी किंचितशी हिरवळही आढळली तरी ती मनाला सुखावते. जीवनाच्या आशा पल्लवित करते. त्याप्रमाणेच हॉटेलमालकांना सतत वेटर्सच्या कटकटींना सामोरे जावे लागत होते. त्यांचा कामचुकारपणा, दांड्या मारणे, भांडणं करणे यांमुळे ते हैराण झाले होते. या कटकटींच्या पार्श्वभूमीवर मनोज हा एकमेव प्रामाणिक व प्रसंगावधानी वेटर त्यांना वाळवंटातील हिरवळ म्हणजेच सततच्या निराशापूर्ण वातावरणातील एकमेव आशा वाटत होता.

## उतारा ३१

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.**

**ग्राहकांनी हॉटेल मालकाकडे केलेल्या तक्रारी**
- टोपी घातलेला माणूस → १
- कोपऱ्यातील टेबलवरील बाई → २

**ii.**

१ — **शामूच्या हालचाली मंदावण्यामागे ही कारणे असण्याची शक्यता होती** — २

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.७५ वरील (ओळ क्र. ४१ ते ५२) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[त्या दिवशी दुपारी..............................काऊंटरला येऊन बसलो.]**

SAMPLE CONTENT

२. **i.** **'एनर्जी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.** **(१)**

**ii.** **खालील घटनेचे परिणाम लिहा.** **(१)**

शामू पूर्वीसारखा काम करू लागला.

३. **व्याकरण**

**i.** **खालील वाक्यातील कोणतीही दोन अव्यये शोधा व त्यांचे प्रकार लिहा.** **(१)**

काय आश्चर्य ! शामू पूर्वीसारखा काम करू लागला.

**ii.** **खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. मालक        ब. पोरगं

४. **स्वमत** **(२)**

*'तंत्रज्ञान हे माणसाला पूरक आहे, पर्याय नाही', या विधानाबाबत तुमचे विचार लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. ताट देताच, वेटरचे अवसानच गळाले.

२. भुकेने व्याकुळ लहान मुलाकरता मागवलेले दूध तास झाला तरी वेटरने आणले नाही.

ii. १. त्याची बॅटरी क्षीण झाली असावी    २. चार्जिंग कमी झाले असावे

**२.** i. शामूच्या पोटावरील बटणावर कोणती अक्षरे होती?

ii. परिणामी हॉटेल मालकाचा आनंद गगनात मावेनासा झाला.

**३.** i. काय आश्चर्य ! – केवलप्रयोगी अव्यय

पूर्वीसारखा – शब्दयोगी अव्यय

ii. अ. मालकीण        ब. पोरगी

**४.** मानवाने आपले जीवन सुलभ बनवले ते तंत्रज्ञानाच्या वापरातूनच. वेळ, पैसा व श्रम वाचवणारे हे तंत्रज्ञान मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत मानव या तंत्रज्ञानाचे साहाय्य घेतो. यामुळे, मानवी जीवन सहज व जलद बनले आहे. मानवी जीवनातील बऱ्याच कामांमध्ये तंत्रज्ञान पूरक बनले आहे; मात्र असे असले तरी तंत्रज्ञानाच्याही काही मर्यादा आहेत. यंत्रांना, रोबोजना स्वतःची बुद्धी नसते, भावभावना नसतात. त्यामुळे, त्यांच्या उपयुक्ततेवर मर्यादा पडतात. नेहमीपेक्षा वेगळ्या परिस्थितीत किंवा निर्णय घेण्याची गरज

SAMPLE CONTENT

उद्भवल्यास ही यंत्रे निरुपयोगी ठरू शकतात. तसेच, काही स्थितींमध्ये मानवी भावनांचाही समतोल साधावा लागतो, यंत्रे ही गोष्ट समजू शकत नाहीत, म्हणूनच तंत्रज्ञान माणसाला पूरक असले तरी पर्याय ठरू शकत नाहीत.

## उतारा ३२

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

i.

**रोबो-वेटरमुळे लेखकाला हॉटेल मालकाला लाभलेल्या गोष्टी**

१

२

ii.

**माणुसकीचा धागा जपण्यामागची यांची भावना**

हॉटेल मालक — १

मनोज — २

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र .७६ वरील (ओळ क्र. ८२ ते ९३) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[मी त्या बाईंची भेट..............................हे मलाही समजलं नाही.]**

**२. i. खालील घटनेचे /कृतीचे परिणाम लिहा.** **(१)**

बेशुद्ध पडलेल्या बाईंना लवकर हॉस्पिटलमध्ये नेले.

***ii कारण शोधा.** **(१)**

हॉटेल मालकाची द्विधा मन:स्थिती संपली, कारण ......

**३. व्याकरण**

**i. सूचनेप्रमाणे खालील वाक्याचा काळ बदला.** **(१)**

दिवसभरात अनपेक्षित घटना घडल्या. (अपूर्ण भूतकाळ करा.)

**ii. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.** **(१)**

आलेल्या प्रसंगाला तोंड देताना आम्ही माणुसकीचा <u>धागा</u> पकडून ठेवला.

**४. स्वमत** **(२)**

*‘माणुसकीमुळेच माणूस श्रेष्ठ ठरतो’ या विधानाचा अर्थ स्पष्ट करा.

SAMPLE

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. पैसा   २. बदनामी

ii. १. व्यवसायाचा एक भाग म्हणून   २. उत्स्फूर्तपणे आणि निरपेक्षतेने

**२.** i. परिणामी डॉक्टर त्या बाईंना वाचवू शकले, अन्यथा केस हाताबाहेर गेली असती.

ii. पैशांबरोबर बदनामीही मिळवून देणाऱ्या या रोबोजने लावलेले कलंक मानवी वेटरने एका बाईंचा जीव वाचवून नाहीसे केल्याने हॉटेलमालकाचे डोळे उघडले.

**३.** i. दिवसभरात अनपेक्षित घटना घडत होत्या.

ii. आलेल्या प्रसंगाला तोंड देताना आम्ही **माणुसकीचे धागे** पकडून **ठेवले.**

**४.** मानवाकडे असणाऱ्या बुद्धीच्या बळावर त्याने प्रचंड प्रगती साधली आहे; मात्र असे असले, तरी माणुसकीविना ह्या प्रगतीला काही अर्थ उरणार नाही. जसे मानवाने आपले ज्ञान व बुद्धी वापरून अणूंच्या महाशक्तीचा शोध लावला; पण माणुसकीचा विसर पडल्यामुळे अणुबाँबचा वापर करून अमानुष मानवी संहार घडवला. याउलट असेही दिसून येते, की भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीत देशविदेशाच्या सीमा ओलांडून माणुसकीच्या नात्याने लोक मदतीला धावतात व संकटग्रस्तांना साहाय्य करतात. म्हणजेच, सगळ्या समाजाचा विकास व प्रगती होण्यासाठी माणुसकी महत्त्वाची ठरते, जर माणुसकी नसेल, तर मानव विघातक ठरू शकेल, म्हणूनच माणुसकीमुळेच माणूस श्रेष्ठ ठरतो.

# पाठ २०: सर्व विश्वचि व्हावे सुखी

## उतारा ३३

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

संतांनी सांगितलेले मैत्रीचे निकष

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.८३ वरील (ओळ क्र. २१ ते ३४) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**['अहंकाराचा वारा................................ प्रार्थना करत असतात.]**

SAMPLE CONTENT

२. i. **खालील घटनेचे / कृतीचे परिणाम लिहा.** (१)

माणसात उर्मटपणा आला.

ii. **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** (१)

आपल्याला आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर _______

अ. योग्य प्रमाणात जेवायला हवे. ब. नम्र राहायला हवे.

क. खूप खेळायला हवे. ड. उद्धट वागायला हवे.

३. **व्याकरण**

**सूचनेनुसार वाक्यांचे प्रकार बदला.** (२)

i. परस्पर सहकार्यातूनच मानवी जीवनाचे कल्याण होते. (मिश्रवाक्य तयार करा.)

ii. मला अहंकारी होऊ देऊ नकोस. (होकारार्थी वाक्य तयार करा.)

४. **स्वमत** (२)

*'भूतां परस्परें जडो। मैत्र जीवाचें।' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. मानवी सुख-दु:खाशी सहृदय मनाने समरस होणे

२. दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे

३. दुसऱ्याच्या दु:खात त्याला आधार देणे

४. आपला-परका असा भेद मनात न आणणे

**२.** i. तर तो कधीही यशस्वी होत नाही.

ii. आपल्याला आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर **नम्र राहायला हवे.**

**३.** i. परस्पर सहकार्य असेल तर मानवी जीवनाचे कल्याण होते.

ii. मला निरहंकारी होऊ दे.

**४.** प्रस्तुत ओळ ही संत ज्ञानेश्वर लिखित पसायदानातील असून सर्व प्राणिमात्रांमध्ये भेद विसरून मैत्रीचे घट्ट नाते निर्माण व्हावे अशी प्रार्थना ते विश्वात्म्याजवळ करतात.

मानवा-मानवांमधील अंतर दूर होऊन त्यांनी मनाने जवळ यावे, परस्परांशी जोडले जावे, मानवतेचे नाते त्यांच्यात दृढ व्हावे, अशी प्रार्थना संत ज्ञानेश्वर विश्वात्म्याजवळ करतात. प्रदेश, भाषा, वर्ण, संस्कृती असे सारे भेद विसरून केवळ मानव म्हणून साऱ्यांनी एकत्र येण्याची, परस्परांमध्ये मैत्रभाव जपण्याची भावना मानवाच्या अंतरंगी जागृत व्हावी याकरता ज्ञानेश्वर प्रार्थना करतात. या मैत्रीमध्ये परस्परांना समजून घेणे, सुख-दु:खात साथ करणे, पीडितांना आधार देणे, शक्य तेवढी मदत करणे, मना-मनांमध्ये

SAMPLE COPY

पडलेले अंतर दूर करणे अपेक्षित आहे. ही मैत्री संपूर्ण विश्वाला व्यापून टाकणारी असावी. त्यामुळे, हे संपूर्ण विश्व सुखाने नांदू लागेल, दु:खाचा लवलेशही उरणार नाही. त्यासाठी ज्ञानेश्वर अशा प्रेम, माया जपणाऱ्या, मानवतेचा पाया असणाऱ्या विश्वाच्या निर्मितीकरता विश्वात्म्याजवळ प्रार्थना करतात.

## उतारा ३४

**प्र.१.अ./आ. उताऱ्याच्या आधारे खालील कृती सोडवा.**

***१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**संतांना माणसाकडून अपेक्षित असलेल्या आदर्श कृती**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.८४ वरील (ओळ क्र.५४ ते ६४) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[सर्व संतांनी मागितलेले ................................ लक्ष वेधले आहे.]**

२. i. **एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

संतांचे मागणे मागण्यामागचे हेतू कोणते होते?

ii. **कारण शोधा व लिहा.** **(१)**

माणसाने कुणालाही दुखवू नये, कारण ......

३. i. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** **(१)**

विज्ञानातील चांगले प्रकल्प समृद्धी आणतात <u>पण</u> <u>सुंदर</u> मने ही राष्ट्राची संपत्ती वाढवतात.

ii. **उताऱ्यातील कोणतीही दोन क्रियाविशेषण अव्यये लिहा.** **(१)**

४. **स्वमत** **(२)**

'हे विश्वचि माझे घर आहे' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. सुसंस्कारांची जोपासना करावी  २. कोणालाही त्रास देऊ नये

३. एकोप्याने राहावे  ४. कोणालाही दुखवू नये

**२.** i. संतांचे मागणे मागण्यामागे मानवाचे कल्याण व प्रगती हे हेतू होते.

ii. माणूस कधीही एकाकी राहू शकत नाही, त्याला संवादाची नितांत गरज असते.

३. i. अ. पण – उभयान्वयी अव्यय ब. सुंदर – गुणविशेषण
ii. शक्यतो, आज

४. खंड, देश, राज्य, जिल्हे अशा अनेक स्तरांवर या विश्वाची विभागणी झालेली दिसते. त्यानुसार प्रचंड विविधता येथे दिसून येते. हीच विविधता विसरून, सारी बंधने तोडून केवळ मानव या नात्याने साऱ्यांनी एक व्हावे, त्यात कोणत्याही प्रकारचा भेद राहू नये, प्रत्येक माणूस दुसऱ्याशी माणुसकीच्या नात्याने जोडला जावा अशी प्रार्थना ज्ञानेश्वर करतात. ज्याप्रमाणे कुटुंबातील व्यक्ती परस्परांची प्रत्येक सुख-दु:खात साथ करतात, सदैव एकमेकांसोबत असतात, एकोप्याने जीवन जगतात त्याचप्रमाणे हे सारे विश्वही एक कुटुंब व्हावे, यातील प्रत्येक माणसाने दुसऱ्या माणसाची आपल्या कुटुंबियांसारखी काळजी घ्यावी, प्रत्येक परिस्थितीत एकमेकांसोबत ठामपणे उभे राहावे, माणसामाणसांना जोडणारा जिव्हाळा जपावा अशी प्रार्थना ज्ञानेश्वर या विश्वात्म्याकडे करतात.

जर प्रत्येकाने या विश्वाकडे आपले घर या दृष्टीने पाहिले, तर माणसामाणसांतील सारे भेद क्षणात मिटून जातील आणि सारे विश्व सुखाने नांदू लागेल. याकरता प्रत्येकामध्ये ही भावना रुजावी अशी प्रार्थना ज्ञानेश्वर करतात.

# अपठित गद्य उतारे – प्र.१.(इ)

## प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत गद्य विभागात **प्र.१. (इ)** मध्ये ८ गुणांसाठी एक अपठित म्हणजेच पाठ्यपुस्तकाबाहेरील उतारा देण्यात येईल. येथे विकल्प (Option) देण्यात येणार नाही. या ८ गुणांची कृतीनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे:

१. **आकलन कृती** **२ गुण**

२. **आकलन कृती** **२ गुण**

वरील दोन्ही कृतींमध्ये 'आकृती पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'एका शब्दात उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा', 'योग्य जोड्या जुळवा', 'कारणे लिहा', 'घटनेचा / कृतीचा परिणाम लिहा', 'एका वाक्यात उत्तर लिहा', '_ असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा', 'तुलना करा', 'फरक लिहा' यांसारख्या वैविध्यपूर्ण कृतींपैकी कोणत्याही कृती विचारल्या जाऊ शकतील.

३. **व्याकरण कृती** **२ गुण**

या कृतीमध्ये दिलेल्या परिच्छेदात आलेल्या इयत्ता पहिली ते नववीच्या व्याकरण घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील.

SAMPLE CONTENT

**४. स्वमत** **२ गुण**

विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारे, अभिव्यक्ती क्षमता व विचारांची मांडणी जोखणारे प्रश्न येथे विचारण्यात येतील.

**लक्षात ठेवा:**

१. दिलेला उतारा दोन वेळा वाचा.

२. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.

३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.

४. परीक्षेत आकलन व व्याकरणावर आधारित आकृती पेनने काढणे अपेक्षित आहे.

५. 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा / योग्य पर्याय निवडा' ह्या कृतीच्या उत्तरात विद्यार्थ्यांनी पूर्ण विधान लिहिणे अपेक्षित आहे.

६. 'योग्य जोड्या जुळवा' या कृतीच्या उत्तरात प्रत्यक्ष जोडी लिहिणे अपेक्षित आहे.

## उतारा १

**प्र.१.(इ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**घारापुरी बेटाची वैशिष्ट्ये**

१ २ ३ ४

मुंबईहून दहा किलोमीटर अंतरावर समुद्रात वसलेले घारापुरी हे बेट अनोख्या निसर्गसौंदर्याने नटले आहे. अनोखी सागरी सफर, शहरापासून हाकेचे अंतर, वनस्पती- पक्षी वैविध्य, लेण्याच्या रूपाने लाभलेला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा या वैशिष्ट्यांमुळे हे बेट निसर्गप्रेमी, इतिहासतज्ज्ञ व देशी-विदेशी पर्यटकांसाठी आकर्षणबिंदू ठरले आहे. या लेण्यांच्या प्रवेशद्वाराजवळ पूर्वी हत्तीचे महाशिल्प होते, या शिल्पावरून या बेटाला 'एलिफंटा' हे नाव पडले. सध्या हे हत्तीचे शिल्प भायखळा येथील जिजामाता उद्यानात ठेवण्यात आले आहे. अखंड पाषाणात कोरलेल्या या घारापुरी लेण्यांना 'युनेस्कोने' जागतिक वारसास्थळांचा दर्जा दिला आहे. ही लेणी प्रामुख्याने शैव लेणी आहेत. या लेणी इसवी सन ९०० ते १३०० च्या दरम्यान खोदण्यात आल्या असाव्यात असे इतिहास तज्ज्ञांचे म्हणणे आहे. शिव-पार्वती विवाह, गंगावतरण, तांडवनृत्य करणारा शिव ही या लेण्यांमधील लक्षवेधक शिल्पे आहेत. या लेण्यांमधील शिव गुंफा ही सर्वांत मुख्य आणि भव्य गुंफा आहे. या लेण्यातील भव्य दालनाच्या मध्यभागी असलेली ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन देवांची संयुक्त अशी त्रिमूर्ती शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. अशा या घारापुरी

बेटाच्या निकटच्या सान्निध्यामुळे मुंबापुरीच्या सांस्कृतिक वैभवात भर पडली आहे. १९८९ पासून दरवर्षी साधारणत: जानेवारी -फेब्रुवारी महिन्यात येथे ‘एलिफंटा महोत्सवा’ चे आयोजन केले जाते. अनेक विदेशी पर्यटक आणि कलाप्रेमी नागरिक यामध्ये उत्साहाने सहभागी होतात.

२. i. **खालील चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. घारापुरी लेण्यांना युनेस्कोने दिलेला दर्जा

ब. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात घारापुरीमध्ये साजरा होणारा महोत्सव

ii. **कारण शोधा व लिहा.** (१)

घारापुरी बेटाला ‘एलिफंटा’ हे नाव पडले कारण .............

३. **व्याकरण** (२)

**खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती लिहून तक्ता पूर्ण करा.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| i. | मुंबईहून | | |
| ii. | सौंदर्याने | | |

४. **स्वमत** (२)

तुम्ही पाहिलेल्या एखाद्या ऐतिहासिक स्थळाचे वर्णन करा.

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

१. १. अनोखी सागरी सफर

२. शहरापासून हाकेचे अंतर

३. वनस्पती, पक्षी यांमधील वैविध्य

४. ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपणारी लेणी

२. i. अ. जागतिक वारसास्थळ ब. एलिफंटा महोत्सव

ii. घारापुरी बेटावरील लेण्यांच्या प्रवेशद्वाराजवळ पूर्वी हत्तीचे महाशिल्प होते.

३.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| i. | मुंबईहून | **हून** | **पंचमी** |
| ii. | सौंदर्याने | **ने** | **तृतीया** |

SAMPLE

४. महाराष्ट्राचा अभिमान असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या सिंधुदुर्ग किल्ल्यावर जाण्याची संधी मला शाळेच्या सहलीदरम्यान मिळाली. अरबी समुद्रात स्थित करटे नावाच्या बेटावर ४५ एकरांत पसरलेला हा जलदुर्ग म्हणजे मूर्तिमंत इतिहासच होय. येथे असणारे ५२ बुरूज आणि ४५ दगडी जिने हे मराठेशाहीचे सागरी वर्चस्व दर्शवताना दिसतात. तेथील दूध, साखर, दही अशा नावांच्या तीन गोड्या पाण्यांच्या विहिरी आजही येथे अनेकांची तहान भागवतात. या किल्ल्यातील राजाराम महाराजांनी उभारलेले शिवछत्रपतींचे जगातील पहिले मंदिर हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरते. येथे असलेले शिवाजी महाराजांच्या हाताचे व पायाचे ठसे येथे प्रत्यक्ष शिवरायांना भेटल्याची अनुभूती देतात. काळ्याशार दगडांनी बनलेला हा सिंधुदुर्ग किल्ला आजही समुद्रात तेवढ्याच तोऱ्याने उभा राहून इतिहासाचे स्मरण करून देत आहे. येथे भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय आहे.

## उतारा २

**प्र.१.(इ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**जैवतंत्रज्ञानामध्ये खालील संकल्पनांचा एकत्रितपणे वापर केला जातो**

१ | २ | ३ | ४

एकोणिसाव्या शतकात कार्ल एरिके या शास्त्रज्ञाने जैवतंत्रज्ञान ही संज्ञा प्रथम वापरली. जैवतंत्रज्ञान क्षेत्रात अधिकाधिक प्रगती साधण्यासाठी केंद्र सरकारने १९८२ मध्ये 'राष्ट्रीय जैवतंत्रज्ञान महामंडळाची' स्थापना केली. आधुनिक काळात मानवी जीवन अधिक सुसह्य, सुखकारक, सुगम आणि स्वयंपूर्ण व्हावे यासाठी जैवतंत्रज्ञान हे शास्त्र अतिशय उपयुक्त ठरणार आहे. पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रणासाठी जैवतंत्रज्ञान उपयुक्त असल्याचेही संशोधनाअंती स्पष्ट झाले आहे. खरंतर हजारो वर्षांपासून माणसाला जैवतंत्रज्ञानाचे उपयोजन अवगत आहे. दुधापासून दही तयार करणे, किण्वन प्रक्रियेने पाव तयार करणे ही दैनंदिन जीवनातील जैवतंत्रज्ञानाच्या अवलंबाची उदाहरणे आहेत. जैवतंत्रज्ञानामध्ये जीवशास्त्र, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आणि अभियांत्रिकीच्या संकल्पनांचा एकत्रितपणे वापर केला जातो. जैविक घटक आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून मानवी जीवनमान उंचावणे हा या

शास्त्राचा मुख्य उद्देश आहे. जैवतंत्रज्ञानाचा शेती, मानवी आरोग्य, उद्योग आणि पर्यावरण रक्षण यांसाठी वापर केला जातो. या शास्त्राचे एवढे सारे फायदे दिसून येत असले तरीही कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा नेहमी हानिकारकच ठरतो. त्यामुळे, या शास्त्राच्या आधारे निसर्गाच्या कार्यपद्धतीमध्ये हस्तक्षेप न करता योग्य तारतम्य राखल्यास मानवाच्या सर्वांगीण विकासाला योग्य गती लाभेल.

२. i. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)
जैवतंत्रज्ञानाचा मुख्य उद्देश कोणता आहे?

ii. **खालील घटनेचे/कृतीचे परिणाम लिहा.** (१)
जैवतंत्रज्ञानाच्या आधारे निसर्गाच्या कार्यपद्धतीत हस्तक्षेप न करता योग्य तारतम्य राखले असता.

३. **व्याकरण** (१)

i. **खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये शोधून लिहा.**

अ. एकोणिसाव्या शतकात कार्ल तरिके या शास्त्रज्ञाने जैवतंत्रज्ञान ही संज्ञा प्रथम वापरली. [ ]

ब. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा नेहमी हानिकारकच ठरतो. [ ]

ii. **कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.** (१)
कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा नेहमी हानिकारकच ठरतो.
(नकारार्थी करा.)

४. **स्वमत** (२)
एखाद्या तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर करणे पर्यावरणासाठी धोकादायक आहे, हे विधान स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

१. १. जीवशास्त्र २. रसायनशास्त्र
३. सूक्ष्मजीवशास्त्र ४. अभियांत्रिकी

२. i. जैविक घटक आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून मानवी जीवनमान उंचावणे हा जैवतंत्रज्ञानाचा मुख्य उद्देश आहे.

ii. मानवाच्या सर्वांगीण विकासाला योग्य गती लाभेल.

३. i. अ. प्रथम ब. नेहमी

ii. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा कधीच उपकारक नसतो.

४. मानवाने आपल्या सोईकरता, जीवनातील प्रत्येक गोष्ट सुलभ व्हावी याकरता तंत्रज्ञान विकसित केले; मात्र या तंत्रज्ञानाचा मूळ हेतू लक्षात न घेता त्याचा अतिरेकी वापर केल्याने अनेक दुष्परिणाम झालेले दिसून येतात. वाहने, रेफ्रिजरेटर, एअर कंडिशनर ही सर्व याची उत्तम उदाहरणे आहेत. तंत्रज्ञानामुळे माणसाचे आयुष्य सुखकर व सोपे झाले आहे; मात्र आज आपण या सुविधांचा म्हणजेच पर्यायाने या तंत्रज्ञानाचा बेसुमार वापर करतो. परिणामी, प्रचंड प्रदूषण होते. रेफ्रिजरेटर व एअर कंडिशनरमधून बाहेर पडणाऱ्या वायूंमुळे ओझोन थर विरळ होत आहे. वाहनांच्या धुरामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे कित्येक शहरांमध्ये हवेची गुणवत्ता खालावत आहे, जागतिक तापमानवाढही होत आहे. परिणामी, पर्यावरणावर व जलचक्रावर विपरित परिणाम होत आहे, म्हणूनच तंत्रज्ञानाचा वापर तारतम्याने करणे गरजेचे आहे.

## उतारा ३

**प्र.१.(इ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**आज मोठे व्यवसाय म्हणून उदयाला आलेली पर्यटने**

१ २ ३ ४

'केल्याने देशाटन मनुजा चातुर्य प्राप्त होते', असे पूर्वीपासून म्हटले जाते, ते अगदी खरे आहे. आपल्या देशात पूर्वी प्रामुख्याने धार्मिक पर्यटन आणि यात्रा केल्या जात असत. या धार्मिक पर्यटनामुळे त्याकाळी आसेतुहिमाचल भारत देश जोडला गेला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्याकाळी देशाच्या विविध भागांतील भाषा, संस्कृती, परंपरा, ज्ञान यांची देवाणघेवाण या पर्यटनातूनच शक्य झाली. पूर्वीच्या काळी पर्यटनाला जाणे ही आजच्या एवढी सोपी गोष्ट नव्हती. दळणवळणाची साधने, चांगले रस्ते यांची वानवा असल्याने बहुतांश प्रवास पायीच करावा लागत असे. प्रवासादरम्यान विसावा कोठे घ्यायचा हेदेखील निश्चित माहीत नसे. सूर्य उगवल्यावर नियमित कामे आटोपून चालायला सुरू करायचे आणि सूर्य मावळल्यावर ज्या गावात

CONTENT

असू तेथेच विसावा घ्यायचा अशी पद्धत होती. आपल्या देशात पूर्वीपासूनच अतिथीला देव मानायची प्रथा आहे. अवेळी येऊन ठेपलेल्या अतिथीचे स्वागत करणे, त्याची जेवण्याची, राहण्याची व्यवस्था करणे हे एक सत्कर्म मानले जात असे. त्यामुळे, भौगोलिक दुर्गमता व वाहतुकीच्या साधनांच्या अभावामुळे पर्यटनादरम्यान कोठे विसावा घ्यावा लागला तरी पर्यटकाची सोय होत असे. आजच्या काळात पर्यटन हे प्रामुख्याने करमणुकीसाठी केले जाते. धकाधकीच्या जीवनात दोन क्षण निवांतपणे विसावता यावे यासाठी पर्यटनाला प्राधान्य दिले जाते. वन पर्यटन, जल पर्यटन, कृषी पर्यटन, आरोग्य पर्यटन अशा विविध प्रकारांमधून प्रत्येकाच्या आवडीनिवडीनुसार आयोजित केले जाणारे पर्यटन हा आजच्या काळातील एक प्रचंड मोठा व्यवसाय म्हणून उदयास आला आहे.

**२. i. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

पर्यटनामुळे कोणती गोष्ट शक्य झाली ?

**ii. खालील घटनेचे / कृतीचे परिणाम लिहा.** **(१)**

पूर्वी अवेळी येऊन ठेपलेल्या अतिथीचे स्वागत करणे, त्याची राहण्याची व्यवस्था करणे हे सत्कर्म मानले जात असे.

**३. व्याकरण** **(२)**

**गटात न बसणारा शब्द ओळखून तो वेगळा असण्याचे कारण लिहा.**

i. पर्यटन, सोपी, धार्मिक, भौगोलिक    ii. पासून, नुसार, आणि, साठी

**४. स्वमत** **(२)**

पर्यटनामुळे कोणते फायदे होतात असे तुम्हांला वाटते?

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

**१.** १. वन पर्यटन    २. जल पर्यटन

३. कृषी पर्यटन    ४. आरोग्य पर्यटन

**२.** i. पर्यटनामुळे देशाच्या विविध भागांतील भाषा, संस्कृती, परंपरा, ज्ञान यांची देवाणघेवाण शक्य झाली.

ii. परिणामी, भौगोलिक दुर्गमता व वाहतुकीच्या साधनांच्या अभावामुळे पर्यटनादरम्यान विसावा घ्यावा लागला तर पर्यटकांची सोय होत असे.

**३.** i. पर्यटन - कारण ‘पर्यटन’ हे सामान्यनाम असून बाकी सर्व विशेषणे आहेत.

SAMPLE

ii. आणि - कारण 'आणि' हे उभयान्वयी अव्यय असून बाकी सर्व शब्दयोगी अव्यये आहेत.

४. पर्यटन मानवाला वैविध्यपूर्ण अनुभवांची खाण उपलब्ध करून देत असते. जगभरात विविध प्रदेशांमध्ये केलेल्या पर्यटनामुळे करमणूक तर होतेच. सोबतच ज्ञानाची कवाडेदेखील खुली होतात. प्रत्येक प्रदेशाची स्वत:ची अशी भाषा, संस्कृती, परंपरा असते. पर्यटनाच्या माध्यमातून या सर्वांची देवाणघेवाण होते. ज्ञानाचे, विचारांचे आदानप्रदान केले जाते. त्या-त्या प्रदेशाची ऐतिहासिक परंपरा समजून घेता येते. पर्यटनामुळे निसर्गसौंदर्यांचा आस्वाद घेता येतो. त्या-त्या प्रदेशातील साहित्य समजून घेणे शक्य होते. हे पर्यटन माणसामाणसांमध्ये अनोखे बंध निर्माण करते. पर्यटनामुळे मानवाला समृद्ध असे अनुभव प्राप्त होतात. अशाप्रकारे, आनंदासोबतच ज्ञानाची वृद्धी करणारे पर्यटन फायदेशीर ठरते.

## उतारा ४

**प्र.१.(इ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.** **ए.पी.जे अब्दुल कलामांनी हे सुविचार आचरणात आणले**

१ | २

**ii.** **डॉ. कलामांच्या या गोष्टी विद्यार्थ्यांच्या प्रेरणेचा अखंड स्रोत होत्या**

१ | २

भारतीय तरुणांना 'आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं तर आपली झोप उडवतं ते खरं स्वप्न असतं', असे विचारवैभव देणारे ज्ञानयोगी आणि कर्मयोगी शास्त्रज्ञ म्हणजे डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम. शिक्षक, लेखक, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, कुशल प्रशासक, राष्ट्रपती अशा बहुआयामी भूमिका अतिशय समरस होऊन ते जगले. 'विद्या विनयेन शोभते', 'साधी राहणी उच्च विचारसरणी' हे सुविचार खऱ्या अर्थाने आचरणात आणणारे त्यांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. तामिळनाडूमधील रामेश्वरम येथे एका सर्वसाधारण कुटुंबात जन्मलेल्या कलाम यांनी असामान्य बुद्धिचातुर्य आणि अखंड प्रयत्न यांच्या बळावर आकाशाला गवसणी घातली. आपल्या देशाला अवकाश संशोधन क्षेत्रामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान

दिल्यामुळे त्यांना 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाऊ लागले. आपल्या आयुष्याचा कणन्‌कण त्यांनी या देशाच्या सेवेसाठी वेचला. आपल्या देशाला वैभवाच्या शिखरावर नेणे ही त्यांची जीवननिष्ठा होती. त्यांनी देशातील तरुणांना स्वप्न पाहण्यासाठी आणि स्वप्नपूर्तीसाठी अखंडपणे कार्यरत राहण्यासाठी प्रोत्साहित केले. देशातील लहान मुलांशी आणि तरुणांशी संवाद साधण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ते सदैव तत्पर असत. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी ज्ञानदानाचा वसा जपला.'अग्निपंख' हे आत्मचरित्र आणि माझ्या स्वप्नातील भारत, प्रज्वलित मने, भारत - २०२० अशा एकाहून एक उत्कृष्ट पुस्तकांच्या माध्यमातून डॉ. कलाम यांनी अनुभवांचा शाश्वत ठेवा आपल्या हाती सोपवला आहे.

२. i. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

ए.पी.जे. अब्दुल कलामांनी आपल्या जीवनात कोणत्या भूमिका पार पाडल्या?

ii. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. अवकाश संशोधनातील योगदानाकरता डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामांना या नावाने ओळखले जाते.

ब. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र.

३. i. **खालील वाक्यातील सर्वनाम ओळखून त्याचा प्रकार लिहा.** (१)

अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी ज्ञानदानाचा वसा जपला.

ii. **खालील शब्दांचे लिंग बदला.** (१)

अ. लेखक ब. विद्यार्थी

४. **स्वमत** (२)

'आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं, तर आपली झोप उडवतं ते खरं स्वप्न असतं' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

१. i. १. विद्या विनयेन शोभते २. साधी राहणी उच्च विचारसरणी

ii. १. व्यक्तित्व २. कर्तृत्व

२. i. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामांनी आपल्या जीवनात शिक्षक, लेखक, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, कुशल प्रशासक, राष्ट्रपती अशा भूमिका पार पाडल्या.

ii. अ. मिसाईल मॅन ब. अग्निपंख

**३.** i. सर्वनाम –त्यांनी

प्रकार –तृतीय पुरुषवाचक सर्वनाम

ii. अ. शिक्षिका ब. विद्यार्थिनी

**४.** आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं कारण डोळे उघडताच ते नाहीसं होऊन जातं. काही वेळा तर त्या स्वप्नांची पुसटशी आठवणही राहत नाही; मात्र खरं स्वप्न ते असतं जे माणसाला पूर्णपणे जागं करून सोडतं. या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी माणूस सातत्याने धडपडत राहतो. दिवस-रात्र मेहनत करतो. अशा या ध्येयवेडाने झपाटलेल्या माणसाची तहान-भूक हरपली जाऊन केवळ ती गोष्ट मिळवण्याकरता प्रचंड मेहनत तो घेऊ लागतो. या स्वप्नांची नशा माणसाला कोणत्याही इतर आनंदापेक्षा अधिक महत्त्वाची वाटते. त्याचा प्रत्येक क्षण हा त्या स्वप्नाकडे टाकायच्या पुढील पावलाचा विचार करण्यात व्यतीत होतो. असं हे खरं स्वप्न माणसाला प्रिय असणाऱ्या झोपेलाही दूर सारून त्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देते.

## उतारा ५

**प्र.१.(इ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**बुद्धिबळाची कोणतीही चार वैशिष्ट्ये**

१ २ ३ ४

बुद्धिबळ हा काळ्या पांढऱ्या चौकटींची अवघी ६४ घरे आणि ३२ मोहरे यांनी बनलेला रंजक, चित्तवेधक आणि बुद्धीला आव्हान देणारा खेळ आपल्याला तासन्तास एका जागी खिळवून ठेवतो. बुद्धिबळ हा मूळ भारतीय खेळ असून प्राचीन काळी त्याला 'चतुरंग' या नावाने ओळखले जात असे. युद्धसदृश्य असलेला हा खेळ राजेरजवाड्यांमध्ये विशेष प्रसिद्ध होता. राजकारणातील विविध चाली खेळून शत्रूला नामोहरम करण्यासाठी बुद्धिबळाचे डाव उपयुक्त ठरत असत. अनेक बलाढ्य राज्यकर्ते, सरदार आपल्या दरबारात निष्णात बुद्धिबळपटूंना आश्रय देत असत. या खेळामध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी व्यक्तीमध्ये एकाग्रता, समयसूचकता, अखंड सावधपणा आणि संयम या गुणांचा समुच्चय असावा लागतो. या खेळामुळे आपल्या बुद्धीला बळ मिळते, विचारांना चालना मिळते, हे सर्वांनाच माहीत आहे; पण तरीही या खेळामुळे व्यसनाधीनतेतून सुटका होते असे कोणी

सांगितल्यास त्यावर आपला विश्वास बसणार नाही; मात्र केरळ राज्यातील मारोत्तीचल या गावाने बुद्धिबळाच्या साहाय्याने व्यसनमुक्त होण्याची किमया साधली आहे. १९७०-८० च्या दशकात या गावातील लोक दारू आणि जुगार या व्यसनांच्या आहारी गेले होते. सी उन्नीकृष्णन या एका सामान्य चहा विक्रेत्याने मारोत्तीचल या गावातील लोकांना बुद्धिबळ खेळण्यास शिकवले. बघताबघता या गावातील लोकांना बुद्धिबळाचे एवढे वेड लागले, की एखादी जादू व्हावी त्याप्रमाणे गावातील लोक व्यसनमुक्त झाले. जणूकाही गावातील लोकांनी बुद्धिबळाची ६४ घरे आणि ३२ सोंगट्यांच्या साहाय्याने व्यसनाला ‘चेकमेट केले. व्यसनाच्या आहारी जाऊन भ्रष्ट होऊ पाहणारी त्यांची बुद्धी बुद्धिबळामुळे शाबूत राहून तिला विधायक मार्ग गवसला.

२. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. बुद्धिबळाच्या साहाय्याने व्यसनमुक्त झालेले गाव ☐

ब. गावातील लोकांना बुद्धिबळ शिकवणारा चहा विक्रेता ☐

ii. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

बुद्धिबळात प्राविण्य मिळण्यासाठी व्यक्तीमध्ये कोणत्या गुणांचा समुच्चय असावा लागतो?

३. **खालील वाक्याचा दिलेल्या सूचनेनुसार काळ बदला.** (२)

i. बुद्धिबळामुळे विचारांना चालना मिळते. (साधा भविष्यकाळ करा.)

ii. एका सामान्य चहावाल्याने गावातील लोकांना बुद्धिबळ खेळायला शिकवले. (अपूर्ण भूतकाळ करा.)

४. **स्वमत** (२)

तुमचा आवडता खेळ कोणता? त्याचे फायदे लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

**१.** १. रंजक २. चित्तवेधक

३. बुद्धीला आव्हान देणारा ४. तासन्तास एका जागी खिळवून ठेवणारा

**२.** i. अ. मारोत्तीचल ब. उन्नीकृष्णन

ii. बुद्धिबळात प्राविण्य मिळवण्यासाठी व्यक्तीमध्ये एकाग्रता, समयसूचकता, अखंड सावधपणा आणि संयम या गुणांचा समुच्चय असावा लागतो.

**३.** i. बुद्धिबळामुळे विचारांना चालना मिळेल.

ii. एक सामान्य चहावाला गावातील लोकांना बुद्धिबळ खेळायला शिकवत होता.

४. मला कबड्डी हा खेळ खूप आवडतो. या खेळाचे अनेक फायदे होतात. शरीराला योग्य प्रकारे व्यायाम मिळाल्याने शरीर चपळ व बळकट बनते. शरीरात ताकद संचारते. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात बुद्धीचाही विकास घडतो. निरनिराळे डावपेच खेळावे लागत असल्याने बुद्धी प्रबळ होते. खेळताना समोरच्या व्यक्तीचे डावपेच पाहून त्यानुसार निर्णय घ्यावा लागतो; त्यामुळे तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता आपल्या अंगी बाणवली जाते. जबाबदारीची भावना मनात रुजते. संपूर्ण संघाचे नेतृत्व करण्याचा गुण या खेळामुळे विकसित होतो. या खेळामुळे आपण अधिक समाजशील होण्यास मदत होते.

SAMPLE CONTENT

# SSC ekdum Tension Free

with

# IQB Important Question Bank

Based on New Paper Pattern of Maharashtra State Board

**इंग्रजी, मराठी व सेमी इंग्रजी माध्यमासाठी उपलब्ध**




## AVAILABLE SUBJECTS:

- English
- Hindi (Entire)
- Hindi (Composite)
- Marathi
- Maths - 1
- Science - 1
- Maths - 2
- Science - 2
- Geography
- History

## ठळक वैशिष्ट्ये:

- अधिक महत्त्वाच्या प्रश्नांचे संकलन.
- कमीत कमी वेळेत परीक्षेचा अधिकाधिक सराव.
- प्रश्नोत्तरांची गुणनिहाय मांडणी.
- कृतिपत्रिकेच्या प्रारूपानुसार प्रश्नांची रचना.
- स्वयंमूल्यमापनासाठी कृतिपत्रिका समाविष्ट.
- पुस्तकात समाविष्ट Q. R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन करून कृतिपत्रिका प्रारूपाचे विवेचन करणारे व्हिडिओज् तसेच नमुना कृतिपत्रिकेची उत्तरसूचीही पाहता येईल.

**BUY NOW**

Target Publications Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15

mail@targetpublications.org

www.targetpublications.org